नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

2

युगवाणी
१९५८

जा, फे, मे, जून, जुलै, ऑ. स. ऑ.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत १९२३
विदर्भ साहित्य संघ



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वामन नारायण देशपांडे
संपादक 'युगवाणी'
टिळकवाडी, यवतमाळ (वऱ्हाड).

युगवाणी

★

व्यावसायिक पत्रव्यवहाराचा पत्ता
द. ना. ठाकूर,
महेश्वर प्रेस, मुधोळकर पेठ,
अमरावती (वऱ्हाड).

★ अनुक्रमणिका ★

विषय लेखक पृष्ठ

कविता

१ माळण ··· प्रा. पु. शि. रेगे, बी. एस.सी. ··· २
२ कळ्यांनो! ··· श्री. रघुनाथ ··· ··· २
३ ··· ··· ··· पां. आ. गोरे ··· ··· २
४ सन्धिविभंग ··· ··· द. चिं. सोमण ··· ··· २
५ अश्रुफुलें ··· प्रा. ना. वा. शास्त्री, एम्.ए. ··· ३
६ नको विचारूं कोणाचें! गो. रा. दोडके, बी.ए. ३

साहित्यिकाचा परिचय

१ पुरुषोत्तम यशवंत देशपांडे ··· दा.ना. काश्यप ४

साहित्यिकाच्या आठवणी

१ श्रीपाद कृष्णांच्या सहवासांत ··· एक चहाता ६

प्रबंध

१ विदर्भातील आदिवासी ··· द.बा.महाजन ···
कोरकू. बी. ए. ११
२ कोल्होबा! कोल्होबा! ··· वा. वा. पाटणकर
बी.ए.,एलएल.बी. ··· १८

ललित गद्य

१ असह्य जीवन ··· द. चिं. सोमण ··· २०
२ वेडा ··· ··· पद्माकर निमदेव, बी.ए. २३
३ मृत्यूची मुलाखत ··· प्रा.भा. म गोरे, एम.ए. २६
४ नको रे मला देव करूंस! व्यंकटेश वकील,
बी.ए. २७

विविध

१ संशोधकांचें पान ··· बाजीराव पेशवा
(दुसरा) यास
त्याची पत्नी वाराणशीबाई हिचें पत्र— ··· २९
डॉ. य. खु. देशपांडे,
एम.ए., एलएल.बी., डी. लिट्
२ संपादकीय ··· ··· ३०
३ संघवार्ता ··· ·· ३२

★ लेखकांस सूचना

१. लेखकांनी संपादकीय पत्रव्यवहार पुढील पत्त्यावर करावा:—

वामन नारायण देशपांडे,
संपादक—'युगवाणी'
टिळकवाडी, यवतमाळ (वऱ्हाड.)

२. लेख कागदाच्या एकाच बाजूने व शाईने सुवाच्य अक्षरात लिहिण्यांत यावे. ते रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावे, म्हणजे गहाळ होणार नाहीत.

३. लेखाबरोबर उत्तरासाठीं व परतीसाठीं पुरेसें पोस्टेज पाठविण्यांत यावें. त्या खेरीज उत्तर मिळणार नाहीं व लेख परतहि पाठविला जाणार नाहीं. लेख रजि. पोस्टानें हवा असल्यास तेवढीं तिकिटें लेखाबरोबर आगाऊ पाठविण्यांत यावी.

४. लेखाबद्दल कोणतीहि जबाबदारी संपादक स्वत:कडे घेऊं इच्छित नाहीत. लेख गहाळ झाल्यास त्याची जबाबदारी संपादकाकडे राहणार नाहीं.

५. सामान्यत: एक महिन्यांत लेखाची पसंती—नापसंती कळविण्यांत येईल. त्यापूर्वी कोणीहि पत्रव्यवहार करूं नये, नापसंतीचीं कारणें देण्यात येणार नाहीत.

६. लेखकास त्या त्या अंकाची एक प्रत व्यवस्थापकाकडून विनामूल्य पाठविण्यांत येईल. अंक वेळेवर न मिळाल्यास त्याबाबत संपादकाशी पत्रव्यवहार न करतां व्यवस्थापकाशी करावा.

वर्गणीदार, जाहिरातदार—वगैरेनी सर्व व्यावसायिक पत्रव्यवहार पुढील पत्त्यावर करावा:—

व्यवस्थापक 'युगवाणी'
मुधोळकर पेठ, अमरावती (वऱ्हाड.)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ-साहित्य-संघाचें मुखपत्र युगवाणी

वर्ष २ रें | : संपादक : | जानेवारी
अंक १ ला | वामन नारायण देशपांडे |

राज्य दप्तरी संग्रहालय
क्र. ३८३९९
दाखल नोंद क्रमांक
दिनांक १०.२.९४
2
विदर्भ साहित्य संघ, नागपूर
R.3.

चालू अंकांतील कवि व कविता

'युगवाणी'च्या प्रत्येक अंकांत लेखारंभीं त्या त्या लेखकाचा व त्याच्या कृतीचा त्रटित परिचय करुन देण्यांत येत असतो. तसें कवि व कविता यांच्या बाबतींत का करण्यांत येत नाहीं, अशी अनेकांनी पृच्छा केल्यावरुन चालू अंकापासून तशी व्यवस्था करण्यांत येत आहे.

१. 'मालण'—मुंबईचे प्रा. पु. शि. रेगे यांचे 'फुलोर' व 'हिमसेक' हे संग्रह प्रसिद्धच आहेत. विशिष्ट वातावरण निर्माण करण्यांत त्यांचा हातखंडा आहे. 'मालण' कविता चटकदार आहे.

२. 'कलिदूतांनो!'—मोगलाईतील परभणीचे 'बी. रघुनाथ' हे सुंदर गद्याप्रमाणें सुंदर पद्यहि लिहितात. या कवितेंत क्वचित् यतिभंग होत असूनहि मुळाला धक्का न लागावा. एतदर्थ, कविता जशीची तशी छापली आहे. ती अतिशय तडफदार आहे.

३. 'मृत्यूस'—यवतमाळचे सत्कवि पां. श्री. गोरे यांच्या कविता नियत-कालिकांतून प्रसिद्ध होण्याचा मान 'युगवाणी'सच प्रथम मिळत आहे! प्रस्तुत कविता फार हृदयंगम आहे..

४. 'समाधि-भंग'—नाशिकचे 'भावना' कर्ते द. चिं. सोमण यांच्या या कवितेंत त्यांचा नेहमींचा भावनेचा मुलामयपणा दिसून येतो.

५. 'अश्रुफुलें'—बिलासपूरचे प्रा. ना. वा. शास्त्री यांची ही कविता ठाक-ठिकीची व अभिजात रसिकता दर्शविणारी आहे.

६. 'नको विचारुं कोणाचें!'—नागपूरचे सव्यसाची लेखक गो. रा. दोडके यांची ही अनुवादित कविता मानवतेचा संदेश देणारी आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मालण

आढीचा आंबा पिकला काय !
अबलख वारू तयार काय !
जुनीं फिरंगी दारू काय !
मत्तयौवना झुलली काय !

शेवंति पिवळी फुलली काय !
चवळिचि शेंग कवळी काय !
नथथर हरिणी बुझली काय !
नाजुक पुतळी लवली काय !

माधुक मैना...चंचलनयना...
दिला बयाणा नाहिच काय !
मालण कोणी पाहिली काय !
मालण माझी झुकली काय !

—पुरुषोत्तम शिवराम रेगे

★

कलिदूतांनो !

या ! भरा ! भरा ! न्या रास धरा !

दग्ध उरांच्या धूप धगीचे
भोगभाग नव नरमांसाचे
करुनि फेडिले नवस जयांचे
करपल्या आंतड्यांचा याही–
फुलवरा तयांना करा ! करा ! १

तोडित नीरस चर्म तान्हुलें
विवस्त्र सांगाड्यावर थिजले
भरवसतीमधि गृध्र विहरले
ताळबंद साठ्यांत नासवुन
चारला त्रुशींना मोतिचुरा ! २

अहा ! दयेचे मेघ गरजले–
बुद्ध युद्धकल्पनांत रमले
प्रलयाचे नरडें खरखरलें
कलिदूतांनो ! रक्त मुखांनी
गा शांति–संहिता शुभंकरा ! ३

—बी. रघुनाथ

मृत्यूस

आज ना उद्या तरि याल तुम्ही खास गडे !
ठेविलें दार मी रोज म्हणुनि हें उघडें !
परि सरल्या रात्रीं नेत्र गोवितां ध्यानीं
ओतली कृपेची दृष्टि न का हो अजुनी ?
झगझगित दिव्याचें तेज । मंदिरीं
मंचकीं फुलांची शेज । साजिरी
चढवुनी गुलाबी साज । भरजरी
निरसतां जिवाची आस ठायिंच्या ठायीं
मन कैसे फुटतें खापरांतली लाही !

कुणि वदोत अपणा "कभिन्न कपटी काळा"
मनिं साक्ष पटे परि विलसे मुखिं चंद्रकळा !
पाहिलें न कैसें रंगरूप जरि डोळां
मन मनास मिनलें कळे न का लडिवाळा !
जागत्या लोचनीं दीप । उजळुन
मन भरुन मंगल रूप । पाहिन
तापल्या जिवाचा ताप । निवविन
का विलंब आता सख्या ! सारला पडदा !
मी तुमची राधा तुम्हि माझे गोविंदा !

करि रखरख धरणी तपतां दगड पहाड
आशांकुर वटती नवल न सुकतां आड
मोत्यांचा शीतल रिचवा सरसर शिरवा
फुलबाग मनाचा करा एकदा हिरवा !
भडकावितां अंतरिं आग । का उगा ?
नेत्रांचे फेडा पांग । लगबगा
भोगण्यास या सुखभोग । जिवलगा !
'मी–तूंपण' नाही पदर मोकळे चारी !
सुख सुखावेल हो ! पाय टाकतां दारीं !

—पां. श्रा. गोरे

★

समाधि–भंग !

पौर्णिमेचा चंद्र माथ्यावर
धवळलें विशाल अंबर
तारकांचे निस्तेजले पुंज
शशी करी आकाश काबीज

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कौस्तुभाची प्रभा जणुं करी
वैजयंती—रत्नें मंद सारीं !
पांडुरके इवलाले चार
ढग नभीं एकीकडे स्थिर

एकही ना झुळुक स्पर्शीत
एकही ना ध्वनि उमटत
जडाजड सुगाढ निद्रेंत
चोहीकडे अतोनात शांत

शांति तीच मानसीं भरली
अकल्पित समाधि लागली !

* * *

समाधीचा भंग अकल्पित
कुणी केला कळलें पळांत
उघडून पाहतां नयन
परिचित दिसलें वदन

पौर्णिमेचा चंद्र माथ्यावर
पौर्णिमेचा चंद्रच समोर
परंतु तो चंद्रमा आकाशीं
निस्तेजवी समोरचा शशी

धवळलें निकटें अंबर
पांढुरकें होऊन सुंदर
उमटला चुंबनाचा ध्वनी
स्पर्श केला सुगंधी श्वासांनी

जडाजड हासलेसें वाटे
मानसांस भरतीही दाटे !!

—द. चिं. सोमण

★

अश्रुफुलें

वसंतागमें सृष्टिदेवी अहा !
कशी होय उत्फुल्ल ही अंतरीं
दिसें मोद सामावला अंबरीं
सुधा सिंचिली आणि भूमीवरी

सुवर्णी नटूनी थटूनी दिशा
रविस्वागता ठाकल्या येउनी
खगांचे थवे अंतराळांतुनी
मुदें हिंडती गीत आलापुनी

करस्पर्शने भानुच्या कोमल
कळी लाजरी जाहली हासरी
उभारूनिया पंख फुल्पाखरू
कशी झेप घे वायुवीचीवरी

तुझा हस्त दाबूनि वक्षस्थलीं
मिटूनी जराशींच नेत्रोत्पलें
गमे बैसलों—दाटतां नेत्रिं तीं
असत्यास जाणून अश्रूफुलें !

निराधार मी माळ त्यांचीच ही
अहा ! अर्पितों त्वत्स्मृती पूजनीं
मुदें रंगली सृष्टि देखूनि ही
कसें जात मच्चित्त वेडावुनी !

—ना. बा. शास्त्री

★

नको विचारूं कोणाचें !

[मूळ कल्पना John Donne ची]

भवती पाणी बेट एकलें खंडापासुन तुटलेलें
मानवजीवन नच ऐसें परि मानवतेशीं जुळलेलें
ढेकुळ तोडुन भुईपासुनी सागर घे त्याचा घास
भूमि जाहली लहान तितुकी चिमुकलाच कण
जरि जात

कुणिहि बापडा जगतामधुनी काळाने वाहुन नेला
माझ्यामधला अंश चिमुकला तयासवें निघुनी गेला
विशाल आहे मानवता ही मीहि तिच्यामधला एक
मेला कोणी तिच्यांतुनी जर वाटे माझाची अंत
मार्गावरुनी प्रेत चाललें—नको विचारूं कोणाचें !
खांद्यावरुनी जाशी तूंची बघत चेहरे सुतक्यांचे !!

—गो. रा. दोडके

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुरुषोत्तम यशवंत देशपांडे

दामोदर नारायण काश्यप

● गेल्या नाताळांत पुसद येथे भरलेल्या वि. सा. संघाच्या दहाव्या अधिवेशनाचे अध्यक्ष रा. पु. य. देशपांडे यांचा अल्प परिचय रा. काश्यप यांनी या लेखांत करून दिला आहे.

★ ★ ★

रा. पु. य. देशपांडे यांना वऱ्हाड–मध्यप्रांतांत ' पी. वाय्. ' या नांवाने ओळखण्यांत येतें. अर्थात् या लेखांत आपणहि त्यांना त्याच नांवाने संबोधूं या.

पी. वाय्. यांचा परिचय करून द्यावयाचा, तर तो तीन प्रकारांनी करून देता येईल: कादंबरीकार पी. वाय्., ' भवितव्य 'कार पी. वाय्. व पी. वाय्. ही व्यक्ति–हे ते तीन प्रकार होत.

कादंबरीकार पी. वाय्.

पी. वाय्. यांची पहिली कादंबरी ' बंधनाच्या पलीकडे ' ही होय. ही कादंबरी वाचण्यापूर्वी पी. वाय्. हे साहित्यिक आहेत, याची निदान मला तरी जाणीव नव्हती. पी. वाय्. व सौ. विमलाबाई यांच्या प्रेमविवाहामुळे शिक्षित वर्गाला त्यांची ओळख झाली होती, तेवढीच. पण या कादंबरीमुळे त्यांचा लेखक म्हणूनहि महाराष्ट्रास परिचय झाला. नव्हे, या कादंबरीमुळे पी. वाय्. यांनी महाराष्ट्राला गदगदा हलवून त्याला आपला परिचय करून घ्यावयास लावलें, असेंहि म्हणावयास हरकत नाही ! या कादंबरीनंतर पी. वाय्. च्या आणखीहि कांही कादंबऱ्या उजेडांत आल्या, पण त्यांपैकी एकीनेहि एवढी खळबळ उडविली नाही ! अर्थात् आपल्या पहिल्याच कादंबरीने पी. वाय्. महाराष्ट्रभर प्रसिद्धीस आले.

'बंधनाच्या पलीकडे' या कादंबरीनंतर पी. वाय्. यांच्या ' सुकलेलें फूल ', ' सदाफुली ' ' विशाल जीवन ', ' काळी राणी ' व ' नवें जग ' या कादंबऱ्या क्रमाने प्रकाशित झाल्या, त्यांपैकी ' नवें जग ' ही अखेरची कादंबरी सपशेल पडली ! पण इतर कादंबऱ्या मात्र वैशिष्ट्यपूर्ण अशाच आहेत. ' काळी राणी ' कादंबरीवर अनेकांनी टीकेची झोड उठविली. पण या कादंबरींत पी. वाय्. यांचें निराळेंच सामर्थ्य प्रत्ययास येतें, असें मला वाटतें. या कादंबरींत नग्न जलविहाराचा प्रसंग आहे, तसाच तो रा. माडखोलकर यांच्या ' नागकन्ये ' तहि आहे. पण या दोन्ही कादंबऱ्यांत जमीनअस्मानचें अंतर आहे ! उर्वरित कादंबऱ्यांत बांधेसूद रचना व प्रतीकपरता यांसाठी ' सुकलेलें फूल ', केवळ गद्यकाव्यच वाटेल अशा किस्येक वर्णनांसाठी ' सदाफुली ' व समाजवादी दृष्टिकोनासाठी ' विशाल जीवन ' या कादंबऱ्या मराठी कथावाङ्मयांत उल्लेखनीय आहेत. अर्थात् या कादंबऱ्यांत दोष नाहीत, असें नाही. त्यांत दोष विपुल आहेत. उदाहरणार्थ, ' विशाल जीवन ' कादंबरीचा अखेरचा भाग पहा. ही कादंबरी इतक्या घिसाडघाईने पुरी करण्यांत आली आहे की, कुणासहि त्याचें आश्चर्यच वाटेल ! पी. वाय्. यांच्या सर्व कादंबऱ्यांत ' सुकलेलें फूल ' हीच कादंबरी कलादृष्ट्या सरस उतरली आहे.

पी. वाय्. यांच्या शेवटल्या–शेवटल्या कादंबऱ्यांतील भाषेबद्दल पुष्कळच गैरसमज पसरलेले निदर्शनास येतात. या कादंबऱ्यांतील भाषा सोपी नाही, हें खरें. परंतु हें बुद्ध्या आणलेलें अवडंबर खचित नव्हे ! लेखकांस कांही तरी नवीन सांगावयाचें आहे व तो समर्पक शब्दयोजनेसाठी धडपडत आहे, असें दृष्टोत्पत्तीस येतें. हीच गोष्ट पी. वाय्. यांच्या किंचित् अवघड अशा भाषेस कारणीभूत झाली आहे, असा माझा कयास आहे.

तें कांही असो, पी. वाय्. यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कादंबऱ्यांमुळे मराठी वाङ्मयांत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्वत:स स्वतंत्र स्थान प्राप्त करून घेतलें आहे, ही वस्तुस्थिति कुणीहि नाकारूं शकत नाही. फडके, खांडेकर, माडखोलकर–प्रभृति धुरंधर कथालेखकांबरोबर पी. वाय्. यांचाहि नामनिर्देश करणें टीकाकारांस अपरिहार्य झालें आहे, यांतच त्यांचा मोठेपणा आहे.

'भवितव्य'कर्ते पी. वाय्.

परंतु केवळ ललितलेखन करून समाधान मानणें पी. वाय्. यांना शक्य नव्हतें. ते पुरेपूर समाजवादी झाले होते. समाजवादी तत्त्वज्ञान त्यांना स्वस्थ बसूं देत नव्हतें. म्हणून त्यांनी 'भवितव्य' हें साप्ताहिक सुरूं केलें व त्यांतून समाजवादी तत्त्वज्ञानाचा पुरस्कार धडाक्याने सुरूं केला! कोणत्याहि गोष्टीचा अगदी टोकास जाऊन पुरस्कार करावयाचा, या स्वभावधर्मा-प्रमाणे पी. वाय्. यांनी समाजवादाचा हिरिरीने प्रचार सुरूं केला. अर्थात् आरंभीं–आरंभी 'भवितव्या'मध्ये कॉंग्रेस व गांधीजी यांजवर तीव्र टीका यावयाची. किंबहुना, कांही प्रसंगीं तर जनाब जिना यांस पाकिस्तानहि देऊन टाकावें, असें म्हणण्यापर्यंत पी. वाय्. यांची मजल गेली होती. दुर्दैवाने 'भवितव्य' कांही काल मध्येच बंद पडलें. पण लौकरच तें नव्या जोमाने सुरूं झालें. तथापि काय चमत्कार सांगावा! हें नव्याने चालूं झालेलें 'भवितव्य' कॉंग्रेस व गांधीजी यांची निर्मळ स्तुति करूं लागलें! ज्या उत्साहाने पी. वाय्. हे पूर्वी समाजवादाचा जय-जयकार करीत होते, त्याच उत्साहाने ते आता कॉंग्रेस, गांधीजी व विशेषत: गांधीवाद यांचा जयजयकार करूं लागले! कम्युनिस्टांनी जें देश-द्रोही (?) धोरण अवलंबिलें होतें, त्यामुळे आपलें मतपरिवर्तन झालें, असें पी. वाय्. यांचें म्हणणें आहे!!

पी. वाय्. चा हा खुलासा कुणास पटो अगर न पटो, त्यांचें मतपरिवर्तन संधीसाधूपणाचें होतें, असें निदान मी तरी करणार नाही. प्रांजलपणा हा पी. वाय्. यांचा सर्वांत मोठा गुण होय, हें लक्ष्यांत घेतां त्यांच्या मनांतील फरक हा प्रामाणिक-पणाचाच आहे, असें गृहीत धरणें भाग आहे.

पी. वाय्. यांनी गांधीवादाची पाठराखी इतक्या धडाडीने केली की, अनेक विचारवंतांस गांधीवादांत नवीन अर्थ दिसूं लागला! आचार्य शं. द. जावडेकर सोडल्यास गांधीवादाचा पी. वाय्. खेरीज आणखी प्रतिभावान् विवेचक महाराष्ट्रांत नव्हता (व आजहि नाही!) पी. वाय्. हे स्वभावत:च तेजस्वी असल्याने त्यांच्या लेखनांतून ओजोगुण ओसंडून वाहूं लागला. लोकमान्य टिळकांच्या 'केसरी'ची आठवण 'भवितव्य' वाचून होते, असें कित्येक मुरब्बी टिळक–भक्तांनी उद्गार काढले आहेत! पी. वाय्. च्या लेखनगुणामुळे अल्पावधींत 'भवितव्या'ची गणना मराठींतील अत्युत्कृष्ट वर्तमानपत्रांत होऊं लागली.

'भवितव्यां'तील कांही लेखांचें पुनर्मुद्रण 'गांधीजीच का?' या पुस्तकांत केलेलं आहे. 'नवीं मूल्यें' या अगदीं नवीन पुस्तकांत पी. वाय्. यांचीं वाङ्मयविषयक भाषणें व लेख हीं संगृहीत केलीं आहेत.

पी. वाय्. ही व्यक्ति!

पी. वाय्. यांच्या वाङ्मयाइतकीच पी. वाय्. ही व्यक्तीहि उल्लेखनीय आहे. त्यांच्या आयुष्यांत आतापर्यंत किती तरी स्थित्यंतरें झालीं आहेत! सबजज्ज होण्यापासून तों तुरुंगवास पत्करीपर्यंत त्यांचें सारे सोपस्कार झाले आहेत! मध्यंतरीं एका राजकीय दरोड्याशीं 'बादरायण' संबंध जोडण्यांत येऊन त्यांचा अकारण छळ करण्यांत आला होता! – अशीं कैक संकटें आलीं व गेलीं. पण पी. वाय्. यांचें नाणें खरें असल्यामुळे त्याचें मोल सदोदित अबाधित राहिलें.

पी. वाय्. हे कमालीचे स्पष्टवक्ते आहेत. बोलतांना ते कुणाचीहि मुर्वत न बाळगतां मनांतलें सारें स्पष्ट सांगून टाकतील. प्रतिष्ठेची खोटी कल्पना बाळगणाऱ्यांना पी. वाय्. यांचा हा स्पष्टवक्तेपणा सहन होणें शक्यच नाही! पण पी. वाय्. हे धिङ्गाणी किंवा खुनशी मुळीच नाहीत, उलट ते पक्के खिलाडू वृत्तीचे आहेत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यामुळे प्रसंगोपात्त त्यांनी एखाद्यास टरकावलें, तरी त्याची वाजवी स्तुति करण्यासहि ते कचरणार नाहीत. एवढेंच काय, पण आपल्या निंदकाचाहि ते रास्त गुणगौरवच करतील! हेंच पहा ना: डॉ. केदार यांनी पी. वाय्. यांची लॉ कॉलेजांतील प्रोफेसरी क्षुल्लक कारणावरुन काढून टाकली. पण 'भवितव्या'ने केदारांची अवश्य तेव्हा स्तुतिस्तोत्रेंच गाइलीं. पी. वाय्. यांच्या खिलाडू वृत्तीचा असाच अनुभव इतर कुणासहि येईल. यामुळे पी. वाय्. यांच्याशीं मैत्रीच काय, पण दोन हात करण्यास देखील कुणासहि आनंदच वाटेल! सर्वसाधारण साहित्यिकांची संकुचित मनोवृत्ति पाहिली, म्हणजेच पी. वाय्. यांच्या या गुणाचें महत्त्व पटेल.

पी. वाय. हे शिष्टाचाराच्या नसत्या कल्पनांना बिलकूल थारा देत नाहीत. पुसदच्या संमेलनांत अध्यक्षीय भाषणानंतर त्यांनी धूम्रपानास सुरवात केली, हें पाहून कित्येक शालीशिष्टांनी नाकें मुरडलीं! पण त्यांत एवढें आक्षेपार्ह काय होतें, कळत नाही! पी. वाय. यांच्यासंबंधीं अशा लहान-सहान गोष्टींमुळे गैरसमज होतात, हें वरीक खरें.

पी. वाय्. यांचें मध्यंतरींचें मतपरिवर्तन प्रांजल असलें, तथापि तें कांहींसें आश्चर्यकारक आहे, यांत शंका नाही. मनुष्य इतक्या थोड्या अवधींत एका टोकापासून थेट विरुद्ध टोकापर्यंत जातो तरी कसा, याचेंच नवल आहे! तथापि पी. वाय्. हे गांधीवादाकडे कसे झुकले असावे, याची मला एक उपपत्ति सुचते : गेल्या महायुद्धामुळे जगांतील सर्व विचारवंतांस जर कोणती गोष्ट ठसठशीतपणें पटली असेल, तर ती ही होय कीं, आधिभौतिक सुधारणेबरोबर मानवांतील 'मानवता' कमी-कमी होऊं लागली आहे. मनुष्यजातीचा कडेलोट व्हावयाचा नसेल, तर मानवांनीं 'मानवतादेवी'ची उत्साहानें उपासना करावयास पाहिजे. या उपासनेचे कांहीं प्रकार गांधीवादांत निःसंदिग्धपणें दृग्गोचर होतात, म्हणूनच पी. वाय्. हे समाजवादाची कास सोडून गांधीवादाकडे झुकले असावे, अशी माझी कल्पना आहे. ती खरी असल्यास पी. वाय्. यांचें हें मतपरिवर्तन पुष्कळांस बुचकळ्यांत टाकणारें वाटत असलें, तथापि विचारी लोकांस तें त्यांच्या थोरपणाचेंच द्योतक वाटेल, यांत मला संशय नाही!

● ● ●

श्रीपाद कृष्णांच्या सहवासांत

एक चहाता

● पुढील आठवणी कै. श्री. कृ. कोल्हटकर यांच्या एका चहात्यानें १९२५ सालीं लिहून ठेवल्या होत्या. हे गृहस्थ सध्या बोलपटक्षेत्रांत चमकत आहेत. १९२५ मध्ये ते शाळेंत शिकत असतां मुद्दाम जळगावास जाऊन कोल्हटकरांना भेटले होते. कोल्हटकरांशीं झालेलें सर्व संभाषण त्यांनीं लगेच लिहून ठेवलें होतें. या आठवणी लिहून झाल्यानंतर लगेच त्या माझ्या अवलोकनांत आल्या होत्या, हें येथे मुद्दाम नमूद करावेसें वाटतें.

* * *

१

जळगाव. तारीख ५-५-१९२५. वेळ रात्रीं ९ ते ११ वाजतां.

'दुटप्पी की दुहेरी' या कादंबरीवर बराच वेळ चर्चा झाली. कादंबरीच्या कथानकाविषयीं प्रश्न-वगैरे केल्यानंतर तात्यासाहेब तिच्याबद्दल म्हणाले, "ही कादंबरी महाराष्ट्रांत बरीच खळबळ उडवील, अशी माझी अपेक्षा होती व त्याप्रमाणे बरीच खळबळ झालीशीहि वाटते! परवाच प्रा. मायदेव यांचें पत्र आलें की, 'दुटप्पी की दुहेरी' आम्ही हिंगण्याच्या शाळेंत

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सुरू करण्याचें ठरविलें आहे.' नागपूर व मुंबई युनिव्हर्सिटींतहि हें पुस्तक मॅट्रिककरता [1]'अपॉइंट' करण्याचें घाटत आहे. शिवाय वामन मल्हार जोशी, ओगले यांचीं पत्रें आलीं आहेत की, कादंबरी त्यांना फार आवडली व लौकरच ते 'विरतारां'तून व 'महाराष्ट्रां'तून सविस्तर टीकालेख प्रसिद्ध करणार आहेत. सध्या ज्या कांही टीका प्रसिद्ध झाल्या आहेत, त्यांत 'ज्ञानप्रकाश' मध्ये प्रसिद्ध झालेली टीका बरीच सरस आहे. सामान्य लोकांना कादंबरी न आवडण्याचें कारण भाषा बरीच अवघड व संदर्भ लौकर न लागणारी अशी आहे व कथानक कमी चटकदार आहे.

"खरें पाहतां कथानक फारच चटकदार आहे. विशिष्ट आवडीच्या लोकांनाच तें चटकदार वाटेल, इतरांना बरेंच कंटाळवाणें होतें. मागे तुम्हाला सांगितलेंच की, 'श्यामसुंदर' लोकांना जास्त आवडेल. कारण ती कादंबरी भावनात्मक असून शेवट 'पॅथेटिक्' आहे. शिवाय भाषाहि बरीच सुटसुटीत आहे."

* * *

नंतर स्फुटलेखांविषयीं गोष्टी निघाल्या. ते म्हणाले, "स्फुट लेखांचे दोन भाग करण्याचें ठरविलें आहे. एक निवडक लेखांचा व दुसरा स्फुट लेखांचा. लेखसंग्रहाला केळकर प्रस्तावना लिहिणार आहेत व संपादकहि तेच आहेत. ते म्हणाले की, "तुम्ही म्हणाल तर प्रकाशकहि मीच होतों." पण त्यांच्यामागे इतर कार्यांचा अतिशय व्याप असल्यामुळे प्रकाशनाचें काम दुसऱ्याकडे देण्याचें ठरविलें आहे. मला तर आजकाल असें झालें आहे कीं, मी लेखसंग्रहानें काम केव्हा एकदा व्यवस्थित रीतीने पार पाडतों. कारण मला आता १–२ वर्षांवर माझा भरंवसा नाही. लेखसंग्रहाचें प्रकाशन व्यवस्थित झालें की, माझ्या सर्व इच्छा पूर्ण झाल्याच समजा! स्फुटसंग्रह अगदी कसून 'रिव्हाइज्' केला असून शक्य तों पूर्णावस्थेस आणण्याचा यत्न केला आहे."

* * *

यानंतर 'प्रिंटर्स–पब्लिशर्स' यांच्याविषयीं गोष्टी निघाल्या. त्यांत नेहमीप्रमाणें त्यांना बरींच दूषणें दिलीं व ते कसे फसवतात, किती हलगर्जी असतात, याची एकदोन उदाहरणें सांगितलीं. त्यांत ×××× यांचा बराच उल्लेख करण्यांत आला. एकंदर बोलण्यावरून त्यांच्यावर बराच रोष दिसला! छपाई–वगैरेच्या गोष्टी निघाल्या व त्यांनी विचारलें की, "तुम्ही 'संपूर्ण बाळकराम' पुस्तक पाहिलें का?" त्या पुस्तकाच्या छपाईची–वगैरे बरीच स्तुति झाल्यावर सहज ओघाओघाने गडकऱ्यांविषयीं गोष्टी निघाल्या. त्यावेळीं ते म्हणाले, "अहो, आजकाल या आठवणी लिहिणाऱ्या लोकांनी फारच धुमाकूळ माजवला आहे! अगदीं डोळ्यादेखत वाटेल तशीं खोटीं विधानें ठोकून देतात. विशेषत: गडकऱ्यांच्या बाबतींत तर या लोकांनीं कमालच केली आहे! जवळजवळ त्यांनें चरित्रच बदलून टाकलें आहे!"

"मग तुम्ही त्याचा प्रतिकार का करीत नाही?" असा प्रश्न विचारला असतां ते म्हणाले, "अहो, परिस्थिति अतिशय नाजुक आहे. शिवाय ओघाओघाने सर्व खऱ्या गोष्टी बाहेर येतीलच व नंतर या प्रकरणाला निराळें वळण मिळेल. शिवाय गडकऱ्यांच्या बाबतींत मीं लिहिणेंहि योग्य होणार नाही. त्यांच्या आठवणी लिहिण्याबद्दल मला पुष्कळांकडून आग्रह होतो, पण मी अगदी ठरवूनच टाकलें आहे की, पुढेमागे गडकऱ्यांविषयीं कधीच कांही लिहावयाचें नाही! आपोआपच परिस्थिति सुधारेल व लोकांना समजावयाचें असेल, तें समजेल. आता गडकऱ्यांविषयीं विषयच निघाला आहे, तर एकदोन गोष्टी सांगतोंच:—

"कांही गडकरी–भक्त अशी दर्पोक्ति करतात की, गडकरी कधीच उसनवारी करीत नसत आणि या स्वकृत विधानाला पुष्टी देण्याकरिता स्वत: गडकरीच अशी दर्पोक्ति करीत,

---

१. आठवणींतील इंग्रजी शब्द मुद्दाम कायम ठेवले आहेत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असें ते खुशाल लिहितात! मला वाटतें, स्वत: गडकरी असें बोलले नसतील. कारण आपण सर्वांत जास्त उसनवारी केली आहे अशी त्यांना पूर्ण जाणीव होती! पुन: असेंहि वाटतें की, गृहस्थ बोललाहि असेल! एकदा स्वारी बोलतां बोलतां मजजवळ बोलली की, 'मी जर कादंबरी लिहावयाला घेतली, तर हरिभाऊंना सुद्धा रडवीन!' मीं म्हटलें, 'अरे गृहस्था, एक गोष्ट तर लिहून दाखीव, मग लांब लांब गोष्टी कर!' एवढें खरें की ते उसनवारी अतोनात करीत व त्याची त्यांना पूर्ण जाणीवहि होती. आणि, तसें ते कबूलहि करीत! याबद्दलची एक गोष्ट सांगतोंच तुम्हांला!

"जेव्हा गडकरी 'प्रेमसंन्यास' अगदी पहिल्याने वाचून दाखवूं लागले, त्यावेळी तें ऐकत असतां मला एकसारखे विजेचे धक्के बसत. मी त्याचवेळीं त्यांना म्हटलें, 'का हो माझ्या नाटकांतून तुम्ही ही किती चोरी केलीत?' याला त्यांनी अतिशय आपलेपणाने व प्रेमळपणाने उत्तर दिलें– 'तात्या, आपल्या घरांतली वस्तु घेतली म्हणजे ती चोरी का झाली?' माझ्याविषयीं त्यांना इतका आपलेपणा वाटत असे! आणखी ते म्हणाले, 'तात्या, तुमच्या नाटकांतून मीं कांहीं कांहीं कल्पना घेतों व आठवडा–दोन आठवडे झटून त्या कल्पनांना अगदी 'पॅरलल' अशा कल्पना शोधून काढतों. आणि, थोडीशी निराळी सजावट करून नाटकांत कोठे तरी घुमडून देतों, झालं! लोकांना कळतंय कुठे!'

"गडकऱ्यांनी माझ्या नाटकाचा इतका अभ्यास केला होता की, ते मला म्हणत, 'तात्या, तुमची एकूण एक नाटकें जर हरवलीं, तर तीं मी अक्षरश: लिहून काढीन.' यांतील अतिशयोक्ति वगळली, तर ते म्हणतात तितकी त्यांची तयारी खरोखरच होती, असें मलाहि वाटतें."

'नंतर चार आणे–माला–वाला' त्यांच्या दहा नाटकांची एक 'चीप् एडिशन्' काढणार आहे वगैरे गोष्टीवरून त्यांच्या स्वत:च्या नाटकाच्या गोष्टी निघाल्या. ते म्हणाले, "तुम्ही 'जन्मरहस्य' वाचलं काय?" नकारार्थी उत्तर मिळतांच ते म्हणाले, "जरूर वाचा. माझ्या सर्व नाटकांत तें अत्युत्कृष्ट साधलें आहे. पात्रेंहि फारच थोडीं–म्हणजे फक्त सातच आहेत; व शेवटचा प्रवेश तर असा साधला आहे की, कसाहि मनुष्य असला तरी तो रडलाच पाहिजे! शिवाय नाट्यशास्त्राच्या कसोटीस तें अगदी पुरेपूर उतरतें. मीं पुष्कळांना म्हटलें, मला फक्त दोनच सुरेल नट द्या, स्टेजवर अगदी 'सक्सेस' करून दाखवितों. पण मला कोणी ट्रायलच देत नाही!"

अशाच गोष्टी निघाल्या असतां 'शिवपावित्र्या'चा शेवटचा प्रवेश लिहितांना फार फार त्रास पडला, म्हणून सांगितलें. तसेंच 'जन्मरहस्य' 'शिवपावित्र्य,' 'परिवर्तन,' 'मतिविकार' हीं नाटकें नाट्यशास्त्रदृष्ट्या अत्युत्कृष्ट वाटल्याचें सांगितलें.

"गंधर्व नाटक मंडळीला माझीं तीन जुनीं नाटकें 'स्टेज' करण्याकरिता कोणी एकाने सूचना केली आहे व कंपनी तिचा विचारहि करीत आहे," असेंहि ते म्हणाले. अशाच गोष्टींवरून गोष्ट निघाली असतां मीं म्हटलें, 'गुर्जरांचे 'नंदकुमार' अगदी 'फेल्' झाले!' तेव्हा ते म्हणाले, "हो, मलाहि तसेंच वाटतें. आहे काय त्या नाटकांत! याच गुर्जरांनी अधिकाऱ्यांजवळ असे उद्गार काढले आहेत की, 'कोल्हटकर स्वत: सगळीकडे 'फेल्' होत आहेत व आता ते कादंबरीकडे वळले आहेत! तिकडेहि त्यांची तीच गत होणारशी दिसते!'

कोल्हटकर म्हणाले, "का हो, तुम्हाला काय वाटतं, माझीं नाटकं, लेख, कादंबरी-हीं सर्व अगदी 'फेल्' झाली? अहो आमचा जो हेतुच नाही व ज्याकरिता मीं कांहीइतकाहि यत्न केला नाही, असा हेतु सफल झाला नाही, असें म्हणण्यांत काय अर्थ आहे? मीं नाटकें, लेख, कादंबरी लोकरंजनार्थ लिहिलेलीं नाहीतच!

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मी माझ्या तत्त्वांना कधी—कधी सोडणार नाही! ‘सहचारिणी’ नाटकाच्या वेळीं मुजुमदारांनी अमका फेरफार करून द्या म्हणून म्हटलें, त्या वेळींच मी चक्क सांगितलें की, ‘जें आहे, तें हें आहे! यांत काडीचाहि फरक होणार नाही!’

“मला गडकरी जसा मान देत, तसा हेच गुर्जरहि मला मान देत असत. पण एकदा गृहस्थाने जो एक गैरसमज करून घेतला, तो कायमचाच! तेव्हापासून माझ्या—गडकऱ्यांच्या संबंधाविषयीं बेजबाबदार विधानें करण्याचा त्यांनी सपाटा लावला आहे! अशाच विधानांनी भरलेला एक लेखहि ‘मित्रां’नी परत केलेला मला माहीत आहे! माझ्या व गडकऱ्यांच्या संबंधांत जे काही घोटाळे करून ठेवले आहेत, त्यांत हे व कै. कुळकर्णी प्रमुख होत! हे लोक गडकऱ्यांविषयीं आपलेपणाचा आविर्भाव आणत होते, त्याचें इंगित गडकरी जाणत होते व मीहि जाणतों! जाऊं द्या, हो· तो एक मोठा इतिहासच आहे! प्रो. मायदेवहि एकदा म्हणाले, तुमच्या व गडकऱ्यांच्या संबंधांविषयीं नाविन्यपूर्ण असा लेख लिहून एखाद्या सभेंत वाचण्याचा माझा विचार आहे.’ मी त्यांना म्हटलें, ‘कशाला श्रम करितां उगीच? शेणगोळे खाण्याचा’ प्रसंग येईल!’

एकदा कोल्हटकर म्हणाले, “तुम्ही ‘निबंधमाला’ वाचली काय? वाचली नसल्यास जरूर वाचा. मी जेव्हा मॅट्रिकमध्ये शिकत होतो त्या वेळीं चिपळूणकरांचे भाऊ माझे मास्तर होते. त्यांच्याकडे नेहमी ‘निबंधमाले’चे अंक—वगैरे येत. तेव्हांपासून मला वाचनाची खरी गोडी लागली. त्या वेळेपर्यंत प्रसिद्ध झालेले सर्व लेख मी तीनदा वाचून काढले होते. भाषेच्या अभ्यासा (Language study)ला तें पुस्तक फारच उपयोगी आहे. मी शाळेंत निबंध लिहितांना ‘निबंधमाले’ची उत्तम ‘इमिटेशन्’ करीत असे; व त्यामुळे मला मराठीची मुंबई युनिव्हर्सिटीची फेलोशिपहि मिळाली होती!”

“कै. कुळकर्ण्यांनी ‘जन्मठेप’ म्हणून कादंबरी लिहिली आहे व ती मला अर्पण केली आहे. असली अश्लील कादंबरी माझ्या परवानगीशिवाय अर्पण करण्यांत त्यांचा कुत्सितच हेतु होता, यांत शंका नाही! त्याच्याबद्दल मी त्यांची बरीच कानउघाडणीहि केली!”

२

जळगाव. ता. ६–५–१९२५ वेळ रात्रीं ९ ते ११ वाजतां.

गडकऱ्यांच्या आठवणींविषयीं बोलतांना ते म्हणाले, “मी आठवणी लिहिणार तरी कसा? परिस्थितीच अशी विलक्षण आहे कीं, मी गडकऱ्यांच्या बाबतींत लिहिलेलें कधीच खरें वाटणार नाही! तुम्हाला एक गोष्ट सांगतों व ती तुम्हाला पटते का पहा. यावेळीं गडकरी किर्लोस्कर कंपनींत होते. मी एकदा अगदी अचानक रीतीने त्यांच्या खोलींत गेलों. तों ते काहीसें पुढे घेऊन एका कोपऱ्यांत बसले होते व गुर्जर त्याच खोलींत वाचत बसले होते. मला पाहतांच समोरचें झटकन् खिशांत घालून लक्ष्य नसल्याचा बहाणा करून घाईघाईने बाहेर जाऊं लागले! मीं मध्येच अडवून म्हटलें, ‘अहो, गडकरी, इतक्या घाईने चाललात कुठें? तुमच्याजवळ काय होतं, तें तर आम्हांला कळूं द्या!’ ‘तुमचा कांही संबंध नाही!’ असें फणकाऱ्यासरशी उत्तर देऊन स्वारी झटकन बाहेर निघून गेली! नंतर मी गुर्जरांना विचारलें, ‘काय हो, गडकऱ्यांजवळ काय होतें?’ ते म्हणाले, ‘चांदीची डबी होती.’ ‘मग मला का दाखवली नाही?’ ‘अहो, त्यांत तुमचा लहानसा फोटो होता व त्याची गडकरी फुलें—वगैरे वाहून रोज नेमाने पूजा करीत असतात! त्याप्रमाणे पुजेला बसले होते, तोंच तुम्ही आलांत!’ यानंतर मीं गडकऱ्यांना सांगितलेंहि की, ‘यांत काय विशेष आहे? हे अगदी वाईट आहे! ही तर तुमची मूर्तिपूजा झाली!’ गृहस्थ नुसता हसला, झालें! बोला, पटते का ही गोष्ट तुम्हाला? अशा गोष्टी

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जर मी लिहून काढूं लागलों, तर मला लोक बाहेर तोंड काढूं देणार नाहीत!

"गडकरी अतिशय विचित्र स्वभावाचे असत! तरी पण माझ्याशी ते अतिशय प्रेमळपणाने व भिऊन वागत. ते माझी सेवाहि अतिशय करीत. जुन्या काळांतील शिष्य आपल्या गुरूची जशी सेवा करीत असत, तशीच गडकऱ्यांनी माझी सेवा करावी.

"गडकऱ्यांना माझ्याविषयीं अतिशय अभिमान असे व ते तसें म्हणूनहि दाखवीत. 'या जगांत तुम्ही व माझी आई यांच्याशिवाय मला कोणाचीच भीती वाटत नाही व तुम्ही नसता, तर मी केले आहेत त्यापेक्षा काय काय अनर्थ केले असते, याची मला कल्पनाच करितां येत नाही!'

"गडकरी जें कांही बरें-वाईट करीत असत, त्याची त्यांना पूर्ण जाणीव असे. आता त्यांच्या माझ्याविषयींच्या अभिमानाच्या २-३ गोष्टी सांगतों. गडकरी 'तोड ही माळ' हें नाटक लिहिणार होते. तें नाटक ते मलाच अर्पण करणार होते व अर्पण-पत्रिकेबद्दल मला ते म्हणाले, 'तात्या, 'साऱ्या महाराष्ट्रांत तुमच्या इतक्या योग्यतेचा एकहि मनुष्य न सापडल्यामुळे फिरून हें नाटक तुम्हांलाच अर्पण करीत आहे' अशा अर्थाची या नाटकाला मी अर्पणपत्रिका लिहिणार आहें!' तसेंच, एकदा ते देवलांशीं वादविवाद करीत बसले होते. देवल बरेच तापट असत. विशेषत: माझी-त्यांची नाटकशास्त्राच्या बाबतींत चर्चा होई, त्यावेळीं माझें-त्यांचे नेहमी खटके उडत! एकदा मी बाहेर गेलों असतां ते गडकऱ्यांशी बोलत असतांना म्हणाले, 'अशा रीतीने कोल्हटकरांचा 'पाईंट' खोडून काढतां! त्यांना येऊं द्या. म्हणजे या बाबतींत त्यांची खूपच करतों!' गडकरी म्हणाले, 'माझ्याशींच बोलाना! कोल्हटकर राहिले आठ चौकांपलीकडे! मी त्यांचा एक दवंडीवाला आहे!'"

"मला गडकऱ्यांच्या वाङ्मयांत त्यांची कविता श्रेष्ठ प्रतीची वाटते. तिच्या खालोखाल त्यांचे विनोदी लेख व अगदी शेवटी 'भावबंधन' बाकीचीं नाटकें अगदीच टाकाऊ वाटतात! हें जें तुम्हाला सांगितलें, तेंच गडकऱ्यांनाहि सांगितलें होतें.

" 'राजहंस' कविता मला आवडत नाही व ते स्वत: म्हणत की, I am not proud of it. ती एक 'ट्रिक' आहे. मी कित्येकदा विचारलें असेल की, 'ट्रिक' काय आहे, ती तर कळूं द्या.' पण त्या गृहस्थाने मरेपर्यंत काय 'ट्रिक' होती, तें सांगितलें नाही! परवा एकाने लिहून कळविलें आहे की, 'राजहंस' हें गडकऱ्यांच्या वेळीं असलेल्या 'रॉयल रीडर' मधल्या एका कवितेचे शब्दश: भाषांतर आहे म्हणून. हीच 'ट्रिक' असेल, दुसरें काय? तसेंच, नाटकांतहि आर्य स्त्रिया, आर्य संस्कृती वगैरेची मोठमोठ्या शब्दांत 'अवाच्या सवा' स्तुती करीत! मीं म्हटले 'कां हो, नाटकांत तुम्ही असें काय करितां?' 'ही एक 'ट्रिक' आहे' असेंच उत्तर त्यांनी दिलें! मीं त्यांना म्हटलें, 'अशा हलक्या 'ट्रिक्स' तुमच्यासारख्यांनी नाटकांत योजूं नयेत' तसेंच, मला एकदा ते 'पुण्यप्रभाव' पहावयास घेऊन गेले. ते समोरच एका कोपऱ्यांत माझ्यासमोर उभे होते वसुंधरेची शेवटलीं-शेवटलीं भाषणें चालू होतीं. त्या वेळेला मीं नुसता त्यांच्याकडे पाहून हसलों! लगेच झटकन् तोंड झाकून गडकरी 'विंग' मध्ये चालले गेले! दुसऱ्या दिवशीं मला म्हणाले 'तुमच्याजवळ तर माझ्या 'ट्रिक्स' मीं सांगितल्या होत्या. मग मला त्या वेळीं कां शरमवलेंत?'

●

३

खामगाव. ता. ९-५-१९२५. वेळ रात्रीं ९ ते ११॥.

असाच इकडच्या तिकडच्या गोष्टी चालल्या असतांना तात्यासाहेब म्हणाले, "माझा शकुनादिकावर-म्हणजे प्रॉव्हिडंसवर — अतिशय भरंवसा आहे, असें सांगितलें, तर कोणाला तें

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

खरें वाटावयाचें नाही. पण मला एक दोन ठोकताळेच असे आले आहेत की, मला वाटूं लागलें, "There is some power which governs man !"

"माझ्या इतका केळकरांचा दुसरा मित्र नाही व मलाहि केळकरांइतका दुसरा मित्र नाही. आम्ही परस्पर एकमेकांशी जितकें मोकळें बोलतों, तितकें दुसऱ्याजवळ कधींच बोलत नाही. सुदैवाने आमच्या 'लाइफ लाइन्स' च इतक्या छान गेल्या आहेत की, कांही विचारूं नका. कधी कटकटी होण्याचा प्रसंगच येत नाही !

"अगदी कॉलेजपासून केळकर मध्यमपक्षीं. आम्हांपैकी कोणा दोघांचा वादविवाद चालला आणि हे तितक्यांत बाहेरून आलेले असले, म्हणजे आपला पांढरा रुमाल खुंटीवर ठेवला की, आमच्यामध्ये येऊन बसत.

"दोघांनाहि विचारीत, 'कारे तुझें काय म्हणणें आहे ? आणि तुझें रे काय म्हणणें आहे ? मग सांगत, 'हं ! याचें हें बरोबर आहे. त्याचें तें बरोबर आहे. एकंदरींत दोघेहि सारखे !'– असें सांगितलें, म्हणजे आम्ही दोघे 'तुम्ही शिष्टपणा का करतां !'– म्हणून त्यांच्यावर तुटून पडत असूं व आपसांतला वाद विसरत असूं !

"एकदा 'मनोरंजन' ने एक छापील जाहीर पत्रक काढून अमक्या प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें कोण लिहितो, असें विद्वानांना विचारलें होतें.

"त्यावेळीं केळकरांनी माझें चरित्र लिहितों, म्हणून उत्तर दिलें. लगेच गडकरी मजकडे आले व म्हणाले, Don't allow him ! तें मी लिहिणार आहें व तो माझा हक्क आहे ! शिवाय केळकर त्यांत एक मिठाचा खडा टाकून देतील !' "

राजकारणाविषयी गोष्टी निघाल्या असतां टिळक व रानडे यांच्या गोष्टी निघाल्या. कोल्हटकरांचें मत थोडक्यांत असें दिसलें:– "टिळक हे धडाडीचे, हुशार, कावेबाज व लोकप्रिय कसें व्हावें, हें जाणणारे असून 'क्रुकेड' कपटी असे असत. ते अतिशय प्रेमळहि होते. याचा सांगलीच्या संमेलनांत मला अनुभव आलाच.

"पण रानडे विद्वान्, साधेभोळे, समुद्रासारखे धिम्या वृत्तीचे व 'सेंट्ली' वाटत असत. मला तर टिळक रानड्यांसमोर क्षुद्र पदार्थ वाटतात !"

• • •

विदर्भांतील आदिवासी–कोरकू

दत्तात्रेय बापूराव महाजन,
बी. ए.

• 'संशोधक' म्हणून मिरविण्याची हाव न धरतां निरपेक्षपणें संशोधन कार्य करणारे रा. महाजन यांस मेळघाटांतील आदिवासियांच्या राहणीचा अभ्यास करण्याची सुसंधी प्राप्त झाली होती. त्यांचा हा लेख समाजशास्त्राच्या अभ्यासकांस अत्यंत उपयुक्त वाटेल.

* * *

हिंदुस्थानांत 'आदिवासी' असें ज्यांस म्हणतां येतें, अशा लोकांची फार मोठी संख्या आहे. हे अर्धवट रानटी समजले जाणारे आदिवासी लोक राना-वनांतून वास्तव्य करतात. किंबहुना, सुधारलेल्या, प्रगमनशील माणसांनी या आदिवासियांना त्यांच्या मूळच्या मायभूमींतून लावून दऱ्याखोऱ्यांत पळवून लावलें, असें म्हटलें तरी जास्त शोभेल. विदर्भांतील मेळघाट, चिखलदरा, जळगांव व एलिचपूर तालुक्यांचा उत्तरेकडील भाग व एलिचपूर–बैतूल दरम्यानचा डोंगरी प्रदेश या विस्तीर्ण अरण्याच्या भागांत आदिवासी लोकांची संख्या विपुल आहे. आजचे जग सुधारणेच्या मागे धावत सुटलें आहे व त्याच प्रगमनशील जगाच्या अगदी काळोख्या भागांत

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

का होईना, आदिवासी वास्तव्य करीत आहेत. तेव्हा त्यांची इच्छा नसतांहि परिस्थीति त्यांना प्रगतीच्या मार्गावर ओढून आणण्याच्या बेतांत आहे. या दृष्टीने पाहूं गेल्यास आदिवासियांत राजकीय जागृति झाल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं आहेत. या मागासलेल्या लोकांचे हिंदुस्थानच्या राजकीय व सामाजिक जीवनांत केवढें महत्त्व आहे, हें मुद्दाम स्पष्ट करण्याचें कारण नाही. आदिवासी जनतेकडे सहानुभूतिपूर्वक लक्ष्य देऊन त्यांचा प्रश्न त्यांच्या हिताच्या दृष्टीने सोडविण्याचा प्रयत्न आपण न केल्यास मुसलमान व हरिजन या दोन समाजाप्रमाणें या तिसऱ्या समाजाची धाडेंहि आपल्या देशाच्या प्रगतीच्या आड येण्याचा संभव आहे.. हें आपण जितक्या लौकर ओळखूं, तितकें चांगलें. आपल्या प्रांताच्या राष्ट्रीय सरकारास या प्रश्नांची जाणीव असल्याचीं सुचिन्हें दिसूं लागलीं आहेत. प्रांतीय सरकारने आदिवासी लोकांच्या सुधारणेकरता एक बरीच मोठी रकम राखून ठेवली आहे व त्यांची सर्वांगीण उन्नति व्हावी, म्हणून एक स्वतंत्र खातेंहि निर्माण केलें आहे. ही सर्व पार्श्वभूमि लक्ष्यांत घेऊन आदिवासी लोकांच्या अनेक जातींपैकी ‘ कोरकू ’ जातीची कधीपासून संगृहीत केलेली माहिती आज या लेखांत ग्रथित करीत आहे.

‘ कोरकू ’ किंवा ‘ कोर्कू ’ या शब्दाचा अर्थ कुणी ‘ मनुष्यजात ’ असा करतात; तर इतरांच्या मतें त्याचा अर्थ ‘ वाटेचा वाटसरू–भटक्या ’ (man of the road) असा होतो. आणि खरेंच पाहूं गेलें, तर कोरकू लोकांत खाजगी मालमत्ता करण्याची जाणीव किंवा आकांक्षा निर्माण होईपर्यंत ते खरोखरच असे शब्दशः भटके राहिले. कुठेहि थोडें धान पेरण्यासारखी काळी जमीन दिसली, लहानसा झुळझुळ वाहणारा ओढा असला, झोपण्याकरता किंचित् निवाऱ्याची डोंगराच्या पायथ्याशीं जागा सांपडली व हिंस्र पशूंपासून व थंडीपासून संरक्षण करण्याकरता रात्रभर जाळतां येतील एवढीं लांकडें मिळालीं कीं, टेकलें बिचाऱ्याने आपलें आसन ! त्याला बिऱ्हाड करायला मुळींच ‘ खर्च ’ पडत नाही. जवळच्या रानांतून वाटेल तेवढीं लाकडें त्यास सहज मिळतात. पळस, मोह, टेंभरूण, चारें, बोरें, साग वगैरे अनेक झाडांचीं पानें व पाहिजे तेवढें गवत त्याच्या हाताशीं असतें. हा निसर्गाने दिलेला मालमसाला त्याची सुंदर व वैभवशाली झोपडी उभारण्यास पुरेसा असतो ! पण लहरीपणांत तरबेज असलेला निसर्ग त्यांच्याशीं नेहमीच मित्रत्वाचें नातें ठेवीत नाही. कधीं पाऊस इतका पडतो की, बिचाऱ्याने मरेपर्यंत कष्ट सोसून पेरणी केलेलें शेत पेरणी होतांच बियासहित वाहून जातें. सुदैवाने पिकें वाढीस लागलीं व धान्य घरांत येण्याची आशा वाटूं लागली की, एकाएकी इतकी प्रखर थंडी पडूं लागते की, सर्व जमिनीवर पांढऱ्या बर्फाचा थर जमतो व सकाळीं हिरवेंगार, प्रफुल्लित व आशापूर्ण दिसलेलीं शेतें रात्रींतून बर्फामुळे पार वाळून कोळ होतात व बिचाऱ्या शेतकऱ्यांच्या आशांचा चक्काचूर होतो ! कधी कधी पाऊस व गारांचा वर्षाव इतका अनिवार होतो कीं, शेतांतील पिकांचा नाश तर होतोच, पण त्याची संपत्ति म्हणून समजलीं जाणारीं गुरेंढोरें व कोंबड्या यांचें अपरिमित नुकसान होतें व त्याची सुंदर झोपडी सुद्धा त्याला व त्याच्या मुलाबाळांस आश्रय देण्यास असमर्थ होतें. अशा वेळीं मात्र धैर्य व चिकाटी या दोन गुणांचा त्याच्या अंगांत अभाव असल्यामुळे तो निराश होतो व परमेश्वर आपल्यावर कोपला व हें स्थान आपणांस लाभदायक नाही, अशी वेडी समजूत करून घेऊन तो स्थलांतर करतो. अशा रीतीने पोटामागे तो व त्याच्यामागे त्याचें पोट लागलेलें असतें व तो पोटासाठी भटकत फिरतो ! त्यास ‘ माझें ’ म्हणतां येईल अशी कांहीतरी वस्तु आपल्याजवळ असावी व तिच्यावर आपला ‘ हक्क ’ असावा, याची अलीकडे–अलीकडे पर्यंत जाणीव नसावी. कोर्कू म्हणजे पूर्णपणें पराधीन प्राणी ! त्याचा ‘ मेघनाद ’ व ‘ डोंगरदेव ’ त्यास ठेवील त्या स्थितींत सदैव राहण्याची त्याची मनापासून तयारी. माणूस हा स्वतःच्या बुद्धीने, धैर्याने व चिकाटीच्या प्रयत्नाने

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पाहिजे ती परिस्थीति निर्माण करूं शकतो, हें त्यास अवगत नव्हतें. या दिव्य तत्वाचा शोध त्यास लागला नव्हता! या तत्वाचें ज्ञान त्याला प्राप्त झालें, पण फार उशीरा व जरा विचित्र तऱ्हेनेच! कसें तें आपण पाहूं.

कोर्कू लोकांच्या मनांत महत्त्वाकांक्षेने प्रवेश केलेला नसेल, पण ते स्वतःच्या मुरगी–भाकरींत समाधान मानीत होते. पोटाला सावा–कोदो–कुटकीचा कोंडा, व उशाला धोंडा यांतच त्यांना आनंद वाटत होता! सणावाराला भुईमुगाच्या शेंगा व गूळ, बकऱ्याचें किंवा इतर मांस व पोटभर मदिरा पिण्यास मिळाली म्हणजे त्या सुखापुढे स्वर्गसुद्धां त्यांना ठेंगणा वाटतो! एकदा मदिरेचा प्याला ओठास लागला, म्हणजे कोरकू हा किती रंगेल व बेफिकीर प्राणी आहे, याची यथार्थ कल्पना होते. तो आपल्या सहचारिणीस घेऊन नाचूं लागतो. अशा रीतीने स्त्री–पुरुषांच्या तरुण–तरुणींचा संमिश्र नाच म्हणजे कोरकूंच्या जीवन–सुखाची परिसीमा झाली. त्याला बाहेरील जगाच्या सुखाची लालसा नाही की, स्वतःच्या दुःखाची खंत नाही. तो एक स्वयंपूर्ण–स्वसंतोषी मानव आहे. अरण्यमय जगांत व अगदी दुर्गम अशा स्थळीं त्यांची वस्ती असल्यामुळे अनेक राज्यें आलीं व गेलीं, अनेक राजकीय आंदोलनें होऊन गेलीं, पण त्या वावटळींचा त्यांना म्हणण्यासारखा उपसर्ग पोचला नाही. घरांत बायको, घराबाहेर पाऊल टाकतांच लावण्यवती सृष्टी व जंगलांत काम करावयास गेलें असतां जवळ जवळ स्नेही बनलेले व्याघ्रादि वन्य पशु हेच त्यांचे खरे खेळगडी म्हटले तरी चालेल! त्यांच्या सहवासांत राहून मिळेल ती भाकरी व करतां येईल ती चाकरी करून सर्व जगाला तुच्छ लेखण्यास ते तयार आहेत. सुधारणेच्या सूर्यप्रकाशाचें किरण अद्यापि तेथे पोहचूं शकले नाही व त्याची त्यांनी कधी पर्वाहि केली नाही. पण हें सुधारलेलें जग त्यांना या 'मागासलेल्या' स्थितींतून बाहेर काढण्यास अत्यंत आतुर झालेलें आहे.

या परोपकारबुद्धीने प्रेरित होऊन बिचाऱ्या कोर्कूंचे कल्याण करण्याकरतां प्रथमतः व्यापारी वर्गाने चंचुप्रवेश केला. बऱ्हाणपूर बाजूचे बोहरी यांनी भुईमुगाच्या शेंगा, गूळ व मीठ आणून त्यांच्या भागेभार कापूस घेणें सुरू केलें. हळुहळू धार्मिक व लग्नप्रसंगाला केवळ त्यांच्या 'कल्याणा' करता म्हणून लहान लहान रकमा कर्जाऊ देण्याचें आमिष दाखवून शेवटी तेथे इस्टेटी केल्या! कोरकू व इतर सर्व अनार्य जातींना मदिरेशिवाय जगणें अशक्य आहे, तेव्हा मारवाडी, कलाल यांचेहि मेळघाटांत थाटाचें स्वागत झालें व त्यांनीहि आपले बस्तान उत्तम बसवून, जमीनजुमले करून हवेल्या बांधल्या! हळुहळू आर्य व अनार्य यांचें संघटण सुरू झालें. व्यापाऱ्यांना नवीन पेठ मिळाली व कोरकूंना मदिरेचें मंदिर म्हणजे दुकान मिळालें! जसजसा संघर्ष वाढूं लागला, तसतशी मिश्रित प्रजा होऊन ती वाढीस लागली. गरीब रहिवाशांची जमीन हळुहळू सावकारांच्या घरांत गेली व आर्य लोक (Non–aboriginals) त्यांच्या जीवावर चैन करूं लागले. कोरकू असले तरी ते 'मानव' आहेत! आम्हांस 'माणूस' म्हणा व 'माणूस' म्हणून वागवा, हीच त्यांची काय ती मागणी आहे. वरील सावकारी पाशाचा त्यांच्या डोक्यांत हळुहळू पण लख्ख प्रकाश पडला! "परकीय लोक येऊन येथें पुष्ट होतात, आपल्यावर जम बसवितात, आमच्या मिळकतीची मलई खाऊन जातात व आम्ही मात्र कोरडेच्या कोरडेच! आणि शेवटीं भटकेच! आपल्यालाहि या परदेशीय लोकांप्रमाणें सुखी होतां येणार नाही काय?" ही कल्पना म्हणजे कोरकू समाजांतील क्रांतीचें व म्हणूनच त्यांच्या उत्कर्षाचें खरें बीज होय!! ज्या क्षणीं, माझे म्हणून काही तरी या स्वार्थी जगांत असावयास पाहिजे, ही भावना या वाटेच्या वाटसरूंच्या मनांत जन्मास आली, तोच त्यांच्या ऐहिक उत्कर्षाचा क्षण समजला पाहिजे. तेव्हांपासून या अनार्यांनी गांवोगांव भटकण्याचें सोडून दिलें व 'पाहुण्या'कडे पाहून त्यांचें अनुकरण करण्यास प्रारंभ केला. यथाकाळ खाजगी मालमत्तेच्या कल्पनेने त्यांच्या मनांत खोल मूळ धरलें व आज दिसत असलेलीं अनेक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

खेडीं अनार्यांनी कायमची वसवलेलीं आहेत तरी पण भटकण्याचें वेड अद्यापि त्यांच्या मनांतून पूर्णपणें नाहींसें झालें नाहीं.

कोरकू व इतर तत्सम अनार्य जातींचा इतिहास त्यांनी व्यापिलेल्या प्रदेशांच्या भूगालेवरच जास्त अवलंबून आहे. कोरकू हें मूळ कोणत्या प्रदेशांतून मेळघाटांत आले, हें नक्की सांगतां येणें फार कठीण आहे. कुणी म्हणतात उज्जनी सोडून ते पंचमढीच्या डोंगरांत शिरले. पण या विधानाला इतिहासांत आधार नाही. ते कोठूनहि आलेले असोत, कीं त्यांना तत्कालीन विजयी आर्यांनी दऱ्याखोऱ्यांत जीव घेऊन पळवून लावलेलें असो, अनेक वर्षांपासून ते या अरण्यमय प्रदेशांत आपलें कष्टमय जीवन व्यतीत आहेत, एवढें मात्र खरें ! कोरकू हा बहुधा रंगाने काळा, बांध्याने ठेंगू, थवकट व पसरट नाकाचा, जाड फिकट ओठांचा, व निस्तेज डोळ्यांचा असा बेडौल प्राणी असतो. त्याचा पोषाख 'पोषाख' या शब्दास न शोभणाराच असतो. ते गुडघ्यापर्यंत असलेलें आखूड व मळकट धोतर, डोक्याचें फाटकें मुंडासें व काळें उघडें शरीर पाहून त्याची खरोखरच कीव येते ! पण अंगावर मिळतील तेवढे दागिने घालण्याचा त्याला हव्यास असतो. कानांत कानवाळ्या, हातांत आंगठ्या, मनगटांत कडे व कमरेला कडसूत्र घालण्याची हौस असते. संसारांतील त्याची सहचारिणी त्याला शोभेल एवढीच ठेंगणी असून रंगाने किंचित् उजळ असते. तिचेंहि नाक पसरट व शरीरयष्टी प्रमाणविरहित असते म्हटलें तरी चालेल. कोरकू स्त्रीपेक्षा बलई (महार) निःसंशय जास्त 'गोरे' व गोंड स्त्रिया जास्त प्रमाणबद्ध व पाणीदार असतात. नाही म्हणायचास तिचे डोळे मात्र पुष्कळवेळां आकर्षक असतात. आपल्या प्रियकरास मोहित करण्याचें तिजजवळ हेंच एकमेव साधन असतें ! कपाळावर शोभेल अशी बिंदी लावून शक्य तोंपर्यंत आकर्षक दिसण्याची ती निष्ठापूर्वक प्रयत्न करण्यास चुकत नाही. कितीहि दागिने दिले तरी तिच्या हौशी मनाला ते कमीच वाटतात ! शरीरांतील असा कोणताहि भाग नाहीं की, जो ती दागिन्याने सजवीत नाही. हातांत सर्वत-हेच्या काचेच्या व धातूंच्या बांगड्या, बोटांत आंगठ्या, गळा तर अनेक तऱ्हेच्या माळांनी नुसता गुरफटलेला असतो. त्यांत कांचमणी, गुंजा व नाना तऱ्हेच्या दिखाऊ पदार्थांच्या माळा घातलेल्या असतात. कमरेला कमरपट्टे व जाड सुताचे कडसूत्र, पायांच्या बोटांत आंगठ्या व पायांत जेवढा जास्त आवाज होईल तशीं पैंजणें ती घालायास सहसा चुकत नाही. ही दागिने घालण्याची हौस पुरी नच झाली, तर ती निराश न होतां निसर्ग-देवतेची मदत घेते व दागिन्याचें कार्य ती अनेक प्रकारच्या रानटी फुलांकडून करवून घेते. झेंडूची फुलें म्हणजे कोरकूंना मनापासून अपरूप ! झेंडूच्या गेंदाचे घोसच्या घोस तिच्या काळ्या केसांवर नागिणीसारखे डोलत असतात. ती एक विशिष्ट प्रकारची वेणी घालून व अलीकडे भांगहि पाडून विशिष्ट प्रकारची केश-भूषा करण्यांत मन घालूं लागली आहे !

हा झाला तिचा शृंगार ! तिचा पोषाख अगदीच साधा, अंगात ती अर्धवट चोळी घालते. पण मागील भाग उघडाच असतो. गोंडाच्या स्त्रियां-प्रमाणें तिचें शरीर अनावृत नसतें. सर्व कोरकू स्त्रियांना चोळ्या असतातच, असें मात्र नाही. नेसण्यास तिला पोकळ साडी-लुगडें असतें. ती डोक्यावरून पदर घेते व मनांतील आनंद, दुःख, लज्जा वगैरे विकार तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसतात. कोरकू स्त्री ही कोरकू पुरुषापेक्षा बुद्धीने जास्त तरतरीत असते, अशी माझी समजूत आहे. कोरकू स्वतः गोंड, बलई, भिल्ल, गवलान यांच्या-पेक्षा बुद्धीने मंदच असतो म्हटलें तरी चालेल. एवंगुणविशिष्ट हें कोरकूचें जोडपें जीवनांतील आनंद उपभोगण्यास कोणत्याहि इतर व्यक्तीस हार जात नाही !

ज्या निबिड व अत्यंत विस्तीर्ण अरण्यांत हे आदिवासी आपलीं घरें करून युगानुयुगें जीवन कंठित असतात, त्याच रानावनांत निसर्गाने त्यांना खाण्यास पोटभर अन्न मात्र दिलेलें नाही. आपण कधीहि न पाहिलेलीं धान्यें म्हणजे कोदो,

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कुटकी, सावा हीं तो आपल्या शेतांत पिकवतो व त्यांवर त्याचा कांहीं काळ निर्वाह होतो. मक्का, ज्वारी, गहूं व तूर यांवर तो एप्रिल, मे पर्यंत कसाबसा जीव धरून राहतो; पण पुढें त्याचें जीवन कष्टाचें होतें! शेवटीं मोहाचीं फळें जमवून, तीं वाळवून त्याच्या भाकरी करून तो आपली भूक शांत करतो. पण एवढ्यानेच त्याचें नष्टचर्य संपत नाही. आळशी कोरकूंना तर कंदमुळें खाऊन दिवस घालवावे लागतात व शेवटी शेवटी तर तरोटा व 'कुत्र्याची छत्री' mushroom) खाण्याची त्यांच्यावर पाळी येते!

आदिवासी हे मांसभक्षक आहेत. मासे पाहिल्याबरोबर ज्याच्या तोंडाला पाणी सुटत नाही, असा कोरकू विरळाच. मासे पकडण्यास दोरीला हूक लावून तो तासच्यातास घालवील! मग त्याला कितीहि जरूरीचें काम असो, त्याची त्याला तमा नाही. पावसाळ्या दिवशीं तर सर्व घरच्या घरच मासे पकडण्यास बाहेर पडतें. कोरकू तरुण–तरुणी मासे पकडण्याच्या-ते टोपलींत भरण्याच्या व्यवसायांत गढून गेलेले पाहण्यांत एक प्रकारची मौज वाटते! कोरकू लोक माशांचे अनेक पदार्थ करतात. मासे पकडून आणून ते चुलीवर टांगून ठेवावयाचे व त्यांना चांगले धुरकटू द्यावयाचें, म्हणजे ते मासे मेजवानींतील उत्कृष्ट पदार्थ झाला! दरिद्री कोरकूंची हीच मोठी मेजवानी होय!

कोरकूंचें खेडें पाहण्याची एक प्रकारची मौज वाटते. दोन्ही बाजूंनीं एकसारख्या गवतांच्या झोपड्या असून मध्यें अगदीं ४०–५० फूट रुंद असा रस्ता सोडलेला असतो. दहादहा किंवा जास्त झोपड्या एकाच रांगेत पण आड्याला आढें लागून बांधलेल्या असतात. गांवाच्या मध्यें एक मोठा चौक असतो. गवलान, बलई, (महार) गोंड भिल्ल यांच्या झोपड्या अशाच ओळीनें पण अंतरावर असतात. गांवच्या मध्यभागीं एखादी झोपडीवजा बैठक असते. तीच सार्वजनिक बैठक होय. प्रत्येक झोपडीच्या मागे एक लहानशी 'मक्काबाडी' असते. तींत मक्का व इतर भाजीपाला वगैरे लावून त्यावर कोरकू हा थोडेफार पैसे मिळवितो. गुरेंढोरें बांधण्यास झोपड्यांना लागूनच कोठे असतात. या सर्व झोपड्या वेळवांच्या तट्ट्याच्याच असतात व छप्पर गवताचें व जंगली झाडांच्या पानांचें असतें. त्यांच्या घराला भिंती सांपडणें जवळ जवळ अशक्यच! दोन झोपड्यांमध्ये फक्त एक तट्टाच काय तो आडपड्याप्रमाणे असतो. मुंबईच्या मजुरांच्या राहणींत व कोरकूंच्या राहणींत या बाबतींत फारसा फरक आढळत नाही. घरांत एक अखंड जळणारी आगटी असते. तेंच त्यांची घरांत उजेड पाडण्याचें व हिवाळ्यांत थंडी निवारण करण्याचें एकमेव साधन होय. रात्र होतांच घरांतील सर्व लहानथोर माणसें या आगटीभोंवती अगदी बेफिकीरपणें झोंपी जातात. विजेचे दिवे व गॅसबत्त्यांचें दर्शन त्यांस अद्यापि व्हावयाचें आहे. गांवांत रात्रीं इतका अंधार असतो की, गांवांतील कुत्रें जर ओरडलें नाही, तर गावांतून पार निघून गेलें, तरी त्याच्या अस्तित्वाची आपणांस जाणीव व्हावयाची नाही!

कोरकू ही स्वभावतःच अत्यंत मागासलेली जात आहे. पाश्चिमात्यांच्या सुधारणेचे पडसाद सुद्धा तिच्या कानावर आलेले नाहीत. कोणत्याहि प्रकारची सुधारणा करण्यास कोरकूंचें मन तयार नसतें. लग्न हा अद्यापि धार्मिक विधि समजला जातो. ज्यांची सांपत्तिक स्थिति लग्न करण्याइतकी चांगली आहे, तेवढेच लोक हा खर्चाचा समारंभ करतात व ज्यांची अशा पद्धतीने लग्नें झालीं आहेत त्यांना त्यांच्या समाजांत एक विशिष्ट प्रकारचा दर्जा प्राप्त होतो. लग्न करणें हें वाटतें इतकें सोपें काम नाही. त्यास बराच खर्च येतो. निदानपक्षीं वहाणांचा एक जोड, एक धोंगडें, एखादा बैल, एक 'चिवना' म्हणजे कोंबडीचें पिल्लूं व कांहीं धान्य तरी नवरी-मुलीच्या बापास दिलेंच पाहिजे. पण गांवचा पुरोहित म्हणजे 'भुमका' याची दक्षिणा राहिलीच! ती निदान तीन रुपये तरी असतेच. याशिवाय मानपान! गांवचा पाटील या विधीबद्दल सव्वा रुपया कर घेतो. नवरा-नवरींना बोरीच्या झाडाखाली नेतात. त्या झाडाला सात प्रदक्षिणा करून असल्यास

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कच्चें सूतहि गुंडाळण्यांत येतें. गांजाची पुडी, तमाखूची जुडी व निदान एक शिशी दारू हें सामान या वेळीं नवरी मुलीच्या बापास मिळावयास हवें. गांवाच्या बाहेर दगडांचा एक ढीग असतो, त्याला ‘मुठवा’ किंवा देव म्हणतात. त्याचेंहि दर्शन घेण्यास हें नूतन जोडपें चुकत नाही. पण लग्नविधि संपला तरी लग्न साजरें झालें, असें म्हणतां येत नाही. खरा आनंद पहावयास मिळतो, तो सर्व वऱ्हाडमंडळी दारू पिऊन तर्र होतात तेव्हा! अशावेळीं दारूचा पहिला प्याला घेण्याचा मान गांवच्या पाटलाकडे असतो.

कोरकू लोकांत ‘लमजाना’ (घरजावई) ठेवण्याची एक विचित्र चाल आहे. तरुण व होतकरू मुलगा, बायको मिळण्याकरतां सासऱ्याकडे घरजावई म्हणून कधी कधी बारा वर्षेपर्यंत सुद्धा नोकरीत राहतो. नोकरीचा मोबदला म्हणून त्याला ‘बायको’ हेंच वेतन मिळतें. पण मधल्या काळांत सासऱ्याचें व लमजान्याचें वाकडें आल्यास, तो तरुण सासऱ्याचें घर सोडून जातो व शक्य असल्यास आपल्या प्रियेलाहि तो नेल्याशिवाय राहत नाही.

कोरकू हे स्वतःस हिंदु म्हणवितात. पण त्यांचा धर्म हिंदुधर्मापेक्षा कांहीसा भिन्नच आहे, असें म्हणावयास हरकत नाही. त्यांचे देव म्हटलें म्हणजे ‘महावीर’ (हनुमान) ‘मेघनाद’ (पर्जन्यदेवता), ‘डोंगरदेव’ व ‘मुठवा’ (ग्रामदेवता) हे होत. त्यांच्या मुळांत मूर्तिपूजा नव्हती, पण अलीकडे ती अंशतः आली. त्यांच्यांत देवळें नाहीत. झाडाखाली ओटे करून त्यावर दगड मांडतात. हेच त्यांचे बहुतेक देव होत. ‘मेघनादा’ची प्रतिमा म्हणजे एक जाड व उंच लाकूड असून त्यास क्रुसाप्रमाणे आडवा दांडा असतो. या लाकडास शेंदूर किंवा गेरू फासून ‘मेघनाद’ सिद्ध करण्यांत येतो! भुतंखेतें व जादुटोणा यांवर कोरकूंचा गाढ विश्वास असतो. रोग म्हणजे देवतांची अवकृपा असेंच ते समजतात.

अलीकडे मुसलमान मुल्ला-मौलवी व ख्रिस्तीधर्मीय पाद्री यांनी कोरकू समाजांत आपापल्या धर्माचा प्रभावी प्रसार चालविला आहे. याचा परिणाम म्हणून बऱ्याच कोरकूंनी धर्मांतर केलें आहे! हिंदु-धर्मियांनी या कटु सत्याकडे दुर्लक्ष्य केल्यास कोरकू व इतर आदिवासी समाज हिंदुधर्मास दुरावल्याखेरीज खात्रीनें राहणार नाहीत!

कोरकू हे अतिशय नृत्यप्रिय आहेत. दिवाळी, दसरा, शिमगा-इत्यादि सणांच्या प्रसंगीं त्यांच्यांत स्त्री-पुरुषांचा मिश्र नाच होतो. याप्रसंगीं मद्यपानहि विपुल प्रमाणावर होते! त्यांचा हा नाच फार प्रेक्षणीय असतो. इंग्रजी अधिकारी वगैरे तो आवडीनें पाहतात.

कोरकूंची भाषा ‘कोरकू’ याच नांवाने ओळखली जाते. इतरांच्या भाषांस ते ‘जांगडी’ (जंगली!) म्हणून हिणवितात. त्यांच्या स्वतःच्या भाषेंत एकहि ग्रंथ झालेला नसून भाषेला लिपीहि नाही. नवलाची गोष्ट ही की, अलीकडे ख्रिस्ती पाद्र्यांनी ‘बायबल’चें कोरकू भाषेंत भाषांतर केलें आहे. तें देवनागरी लिपींत छापलेलेंहि आहे! मजजवळ सेंट मार्क व सेंट जॉन् हीं पुस्तकें आहेत. तीं अनुक्रमें इ. स. १९०० व १९११ या सालीं प्रसिद्ध झालीं आहेत.

या पुढे दोन कोरकू गाणीं शब्दार्थ व भावार्थ यांसह देत आहें. तीं वाचून वाचकांस कोरकू भाषेची कांहीशी कल्पना येईल. या गाण्यांवरून त्यांच्या रंगेलपणाची व अंशतः जीवनाचीहि जाणीव होईल.
हीं गाणीं अशीः—

गाणें १ लें

पुढील गाणें डोक्यावर टोपली घेऊन नाचणाऱ्या स्त्रीस उद्देशून आहे:—

झेलेम झेझेले डो पाली ओजवेन
तारेय आमा नाचनी घोनोयेन १
टिंगिडी टोयागेन डो गुतरा उगीवेन
तारेय आमा नाचनी घोनोयेन २

आचरा लापायेन डो सुतरा भागायेन
तारेय आमा नाचनी घोनोयेन ३
कांबोर टोयायेन डो लांगा उरीयेन
तारेय आमा नाचनी घोनोयेन ४
लांगा लापायेन डो बुलमी भागायेन
तारेय आमा नाचनी घोनोयेन ५
छाटिमी टोयायेन डो चोरगी उरीयेन
तारेय आमा नाचनी घोनोयेन ६
चोरगी टियायेन डो बुचुमी भागरेन
तारेय आमा नाचनी घोनोयेन ७

सेलेम–ओलें झालें. डो–आणखी. पाली–टोपली. ओजवेन–डोक्यावर घेतली. तारेय–मुलगी, तरुणी. आमा–तुझी. घोनोयेन–पुरेसा झाला. टिंगिडी–तंगडी. टोयायेन–स्पर्श केला. सुतरा–पैंजण. उरीयेन–घातला. आचरा–पदर. लापायेन–उडाला. भागायेन–छिन्नभिन्न झाला. कांबोर–कंबर. लांगा–लेहेंगा. बुलमी–मांड्या. भागायेन-दर्द करूं लागल्या. छाटिमी–छाती. चोरगी–चोळी. टियायेन–फाटली. बुचुमी–स्तनाग्र.

भावार्थः—डोक्यावर टोपली घेऊन नाचल्यामुळे घामाने तुझा लहेंगा आर्द्र झाला. हे रमणी! तुझा नाच आता पुरें कर. १

तूं आपल्या पायांत पैंजण घातलेस व हाताने स्वतःच्या मांडीस स्पर्श केलास. हे रमणी! तुझा नाच आता पुरें कर. २

तुझ्या अंगावरील साडीचा पदर उडाला व पैंजणांतील घुंगरहि ओघळले. हे रमणी! तुझा नाच आता पुरें कर. ३

तूं लहेंगा घातलास व स्वतःच्या कमरेस हाताने स्पर्श केलास. हे रमणी! तुझा नाच आता पुरें कर. ४

तुझा लहेंगासुद्धा उडूं लागला व तुझ्या मांड्या दर्द करूं लागल्या. म्हणून हे रमणी! तुझा नाच आता पुरें कर. ५

तूं अंगांत चोळी घातलीस व स्वतःच्या उरूस हाताने स्पर्श केलास. हे रमणी! तुझा नाच आता पुरें कर. ६

तुझी कंचुकीही तटतटली व स्तनाग्र दिसूं लागले. हे रमणी! तुझा नाच आता पुरें कर. ७

गाणें २ रें

पुढील गाणें भावी पति–पत्नीचा संवाद होय. त्यांत भावी पति आपल्या भावी पत्नीचें प्रणयाराधन करीत आहे:—

तो—रे रासी साङ्गन डो बीडी कांबडा बीले
बीडी डो कांबडा लियेन हाजे आलाम मांडी १
ती—बांगोजा बांगोन ढोके इयां आबा डोडोबा रे
तो—आमानी आबा बारेन इयां कुयंकर
.नोरूवा डो २
कोटीला पावीडो बीडी कांबडा बीले
बीडी डो कांबडा लियेन हाजे आलाम मांडी ३
कोटीला पावीडो झीरी रिपीज बोले
हाजेडो हाजे बाओंग हाजे आलाम मांडिबा

रासी–वड. साङ्गन–छाया. बीडी–बडा. कांबडा–कांबळ. बीले–बिछाना कर. लियेन–वर. हाजे–ये. आलाम–आपण. मांडी–भाषण करणें. बांगोजा–छे, छे. बांगोन–नाही, नाही. ढोके–प्रणयी दोस्त. इयां–मी. आबा–बाप. डोडोबा रे–पाहतात रे. आमानी–तुझा. बारेन–बदली. कुयंकर (कुंचकर)–सासरा. नोरूवाडो–संबंध कोठीला–कथलाची. पावीडो–पावा, बासरी. झीरी–बारीक, झऱ्याप्रमाणे मंजुळ, रिपीज–मन मोहीत. बाओंग–साळी, मेव्हणी. मांडिबा रे–भाषण करूं रे.

भावार्थ—

तो—हे रमणी! इकडे ये. वडाच्या गद छायेंत या कांबळीचा बिछाना कर. त्या कांबळीवर बसून आपण गुजगोष्टी करूं. १

ती—छे, छे, नाही रे नाही. हे प्रणयी मित्रा! माझा बाप मला पाहतो ना रे!

तो—अग, तुझा बाप म्हणजे माझा सासराच नव्हे काय! २

कांबळीचा बिछाना कर व मला ती कथलाची बासरी दे. त्या कांबळीवर बसून आपण गुजगोष्टी करूं. ३

हा कथलाचा पावा झऱ्याच्या झुळझुळत्या आवाजाप्रमाणें मंजुळ आहे व तो मन मोहीत करणारा आवाज काढतो, ये, ये, सखी! (प्रेमाची शिवी) आपण गुजगोष्टी करूं ४

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कोल्होबा ! कोल्होबा !

वासुदेव वामन पाटणकर
बी. ए., एल्‌एल्. बी.

● यवतमाळचे रा. पाटणकर हे उत्कृष्ट शिकारी आहेत. 'युगवाणी' त शिकारीवर लेखमाला लिहिण्याचें त्यांनी मान्य केलें आहे, हें जाहीर करण्यास मला आनंद वाटतो. त्यांच्या लेखमालेचा हा पहिला हप्ता होय. या लेखांत 'कोल्हा' या प्राण्याची माहिती देण्यांत आली आहे, ती वाचकांस फार मनोरंजक वाटेल.

* * *

शिकारी जीवनाचा अनुभव मी एक तपापेक्षां अधिक काळ घेतलेला आहे. या अवधींत मी लहान–मोठ्या वाघांसारख्या क्रूर जनावरांची अत्यंत धाडसाने शिकार केली, हें तर खरेंच; परंतु वन्य पशूंच्या राहणीची व त्यांच्या स्वभाव-विशेषांची मी बारकाईने तपासणी केली आहे, ही बाब मला प्रामुख्याने येथे नमूद करावयाची आहे. या निरीक्षणामुळें जंगलांतील पशु–पक्ष्यांच्या सवयी–वगैरेंची अतिशय मनोरंजक माहिती मला वाचकांपुढें ठेवतां येणार आहे. उदाहरणार्थ, माकडांची टोळी दिवसांतून एकदां ठराविक वेळीं विशिष्ट स्थळीं जमून तास–दोडतास स्वस्थ एक-मेकांकडे पाहत बसते, ही घटना मौजेची नाही काय ! मनुष्यांप्रमाणें दिसणारी, पण मनुष्या-सारखीं बोलतां येणारीं हीं माकडें उगाच नेमक्या वेळीं व नेमक्या जागीं एकत्रित व्हावीं व कांहीं न करतां तशींच बसून राहावीं, याची निदान मला तरी फारच गंमत वाटते ! —अशा कैक मौजेच्या लकबी इतर पशु–पक्षांच्याहि सांगतां येतील.

आजच्या लेखांत 'कोल्हा' या प्राण्याविषयीं मी अल्प माहिती सांगणार आहे.

कोल्हा हा भुरक्या रंगाचा असून त्याचें शेपूट झुपकेदार असतें. लहान गावांत अगर खेड्यांत राहणाऱ्या लोकांनी 'कोल्हे–कुई' नेहमीच ऐकिलेली असते ! या कोल्हेकुईबद्दल देखील एक विशिष्ट नियम सांगतां येण्यासारखा आहे. कोल्हे-कुई ही गावाच्या आसपास असलेल्या शेतांत वगैरेंच ऐकू येते. घनदाट अरण्यांत ती कधींच ऐकूं येणार नाही ! अरण्यांत प्राय: नीरव शांतता वास करीत असते. आपण आवाज केल्यास आपल्याहून बलाढ्य प्राण्यास आपला पत्ता लागेल व तो आपणांस गिळंकृत करील, अशी प्रत्येक जनावरास भीति असते. म्हणून तें विशेष कारणा-वाचून अरण्यांत आवाज करणार नाही ! वाघा-सारखे बलवान प्राणीहि या नियमास अपवाद नाहीत. मदोन्मत्त झालेला वाघ–वगैरे मात्र डर-काळ्या फोडील, ही गोष्ट निराळी ! सांगण्याचें तात्पर्य हें कीं, गावाशेजारी रोज रात्रीं ऐकूं येणारीं कोल्हेकुई अरण्यांत नित्य ऐकूं येत असेल, असें एखाद्यास सहजच वाटत असेल; पण तें अगदीं चुकीचें आहे, हेंच मला येथे दाखवावयाचें आहे.

कोल्ह्याविषयीं सर्वसाधारण समजूत अशी आहे की, तो अत्यंत भित्रा असतो ! पण ही समजूत बरोबर नाही, असा माझा अनुभव आहे. एकदा संध्याकाळीं मी नेहमीप्रमाणे फार दूर फिरावयास गेलों असतां एक कोल्होबा मला भेटले. सर्वसाधारण समजुतीला अनुसरून मलाहि असेंच वाटलें कीं ही स्वारी मजपासून लांब पळून जाईल. परंतु अनुभव मात्र थेट उलटा आला ! तो कोल्होबा माझा पाठलाग करूं लागला व तो माझ्या पायाला कडकडून चावणार, असें स्पष्ट दिसूं लागलें ! वाघांचीहि शिकार केलेला मी, पण हातांत बंदूक तर काय, पण साधी काठीहि नसल्याने क्षणभर हतबुद्ध होऊन गेलों ! तथापि कोल्ह्याकडून चावून घेऊन महिना–पंधरवाडा दवाखान्यांत रुग्ण होऊन पडणें न परवडल्यानें अस्मादिकाने 'पलायन्' केलें व जान बचा-वला ! हो, शूरत्वाच्या खोट्या कल्पनेला बळी पडून धोका पत्करण्यांत काय शहाणपणा होता ?

कोल्हा भित्रा नसतो, याचे आणखी एक-दोन

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दाखले देतों. एकदा उन्हाळ्यामध्ये जंगलांत शिकारीसाठीं गेलों असतां मी व कांहीं मुलें पाण्याच्या एका ठिकाणाजवळ थांबलों होतों. संध्याकाळची वेळ होती व वन्य श्वापदें पाणी पिण्यास येण्याचा समय झाला होता. इतक्यांत तीन-चार कोल्हीं आमच्यापासून फक्त पंधरा-वीस फुटांवर येऊन पाणी पिऊं लागलीं! माझ्या सोबतच्या मुलांनी "कोल्होबा! कोल्होबा!"-असा स्वयंस्फूर्तीने गलका केला. पण त्यामुळें त्या कोल्होबांचें जलपान कांहीं थांबलें नाही! "हा काय ताप आहे बुवा!"–असा अर्थ व्यक्त करण्यासाठीं त्यांनी फक्त एकवार मान वर करून पाहिलें आणि पुन: जलपानास नि:संकोचपणें सुरवात केली!

तिसरा प्रसंग तर गंभीरच होता; एकदा रात्रीच्या वेळीं बैलाचा मारा झाला. मी जवळच एका झाडावर बेलफाटींत बसलों होतों. झाडाच्या वरच्या एका फांदीवर एक सोबती बसले होते. चांदणी रात्र होती. इतक्यांत एक भव्य काळसर आकृति दिसून ती किंचित् दूरच्या एका झुडपाआड लपली! ही आकृति वाघोबाची होती. पण आम्हांस पाहून वाघ मान्याजवळ येईना. बरें, वाघ जवळच आसपास आहे, हें कोल्ह्यांना सहजच कळण्याजोगें होतें. त्यांना आमचेंहि अस्तित्व निश्चित ठाऊकच होतें. असें असतांना देखील मित्रीं म्हणून गणलीं गेलेलीं कोल्हीं मान्यावर तुटून पडलीं व त्याचा यथास्थित समाचार घेऊं लागलीं! वाघ व शिकारी यांच्या समोर त्यांना न जुमानतां मारा फस्त करणारीं कोल्हीं मित्रीं आहेत, यावर कोण विश्वास ठेवील बरें? तीं जणू काय आम्हाला म्हणत होतीं, "अहो, शिकारी महाशय, आमची मेजवानी संपेपर्यंत तुम्ही त्या वाघोबाला जरा दूरच ठेवा पाहूं!"

कोल्होबांचें वसतिस्थान डोंगर-माथ्यावरील अलगद पडलेल्या अशा मोठमोठ्या शिलांच्या खालीं अगर आडोश्यास असतें. हें ठिकाण प्राय: वाघ फिरकणार नाहीं अशाच भागांत असतें. उन्हाळ्यांत मात्र पाण्याच्या आश्रयास राहणें भाग असल्यामुळे कोल्होबा अवश्य तर स्थलांतर करतात. हें पाण्याचें ठिकाण किरं अरण्यांतून वाहणाऱ्या नदीच्या पात्रांत असतें, अगर बंदी संपल्यानंतरच्या लांबवर पसरलेल्या मैदानांत असतें.

या पाण्याच्या ठिकाणीं जाऊन पाणी पिऊन 'सही सलामत' आपापल्या निवासस्थानीं परत जाणें हें सर्वच जनावरांना मोठें दिव्यच वाटत असतें! कारण तेथें कोणत्या बलाढ्य शत्रूशीं गाठ पडेल, याचा काय भरंवसा असतो? पाण्याचें हें एकच ठिकाण निदान उन्हाळ्यांत तरी असतें व तेथे सारींच श्वापदें येत असतात. तेव्हा कोण कुणाच्या भक्ष्यस्थानीं पडेल, याचा बिलकूल नेम नसतो! बाकी, पाणी पिण्यास येणारी जनावरें विशिष्ट क्रमाने येतात, हें येथे निर्दिष्ट करावयास पाहिजे. मोर, कोल्हा, वाघ, ससा, डुकर, हरीण, चित्तळ, रोही, सांबर—अशा क्रमाने हे प्राणी पाणी पिण्यास येतात, असें स्थूल मानाने म्हणावयास हरकत नाही. अर्थात् सर्वच स्थळीं हाच क्रम नसतो. कांहीं स्थळीं थोडा निराळा क्रमहि असूं शकतो. पण ज्या ठिकाणीं जो क्रम असेल, त्या ठिकाणीं तो बहुतेक कधीच बदलला जात नाही! तो अविरतपणें तसाच चालू राहतो! पण कोठलेंहि स्थळ असलें, तरी कोल्होबा हे मोर येऊन गेल्यानंतरच पाणी पिण्यास जावयाचे! मोर जर पाणी न पितांच बिचकून परतले, तर कोल्होबाहि तेथे पाणी पिण्यास येणार नाहीत! पाण्याच्या ठिकाणीं असलेल्या झुडपांचा आश्रय घेत घेत कोल्होबा पाण्यावर दबत दबत येतात. तसेंच, पाण्याच्या जवळील कोणत्याहि झुडपाआड कुणी दडून बसलें तर नाही ना, याचा ते सारखा कानोसा घेत असतात! त्यांच्या बाबतींत

But Mr. Fox from childhood knew
that danger lurks where bushes
grew!

या पंक्ति तंतोतंत खऱ्या ठरतात! पाणी पितांना कोल्होबा कुत्र्याप्रमाणें 'चट्चट्' करीत पाणी पितील. सोबत त्यांची सहधर्मचारिणी असतेच!

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पाणी पितांना कानोसा घेणें सुरूच असतें ! नर व मादी पाणी पितांना मौज म्हणून परस्परांस चावे घेऊन प्रणयाराधन करीत असतात ! एकंदरीने कोल्होबा, हे अत्यंत सावध असतात, हें मात्र निःसंशय. म्हणूनच त्यांना 'लुच्चे' समजण्यांत येत असलें पाहिजे !

हरणें, डुकरें, रोही–वगैरेंचे जसे कळप असतात, तसें कोल्ह्यांचे कळप नसावे, असा माझ्या अनुभवान्तीं निर्णय झाला आहे. नाही म्हटल्यास, भुईमुगाच्या शेतावर मात्र त्यांची झुंडची झुंड तुटून पडलेली निदर्शनास येते खरी ! कोल्ह्यांची फक्त जोडीच भक्षार्थ भटकतांना दृष्टोत्पत्तीस येते. निदान माझा तरी अनुभव असा आहे ! इतक्या-उपर शिकारीचा मजपेक्षा जास्त अनुभव असलेले तज्ञ काय म्हणतील ते म्हणोत !

कोल्ह्यांच्या आकारभेदाप्रमाणें त्यांच्या 'कोल्हा' व 'खोकड' अशा जाती होतात. खोकड किंवा भालू यांचें वाघाशीं साहचर्य असतें, असें मानण्यांत येतें. पण तें साफ चूक आहे ! वाघ येण्याच्या आधी दोन तास गाऱ्यावर जाऊन चार–दोन घास खावयाचे व पसार व्हावयाचें, एवढाच खोकडाचा वाघाशीं संबंध आहे ! कोल्ह्याचे शत्रू म्हणजे वाघ, बिबट व तरस हे होत, पण या शत्रूंच्या आहारी जाऊन मृत्युमुखीं पडलेला कोल्हा क्वचितच आढळावयाचा ! कोल्ह्याचें भक्ष्य म्हटलें म्हणजे ससा, उंदीर, बेडूक व पक्षी हें होय.

—याप्रमाणें हे 'कोल्होबा–पुराण' थोडक्यांत दिलें आहे. कोल्ह्याच्या आणखी मौजा सांगतां येतील, पण तूर्त इतकेंच पुरें.

● ● ●

असह्य जीवन !

मूळ लेखक : ऑल्डस हक्स्ले
अनुवादक : द. चिं. सोमण

● रा. सोमण यांची पद्य व गद्य यांजवर सारखीच हुकमत आहे. कवीने गद्याच्या वाटेस सहसा जाऊं नये, असा आपल्याकडे जो खुळचट समज आहे, त्याच्या आहारीं हे तरुण कवि गेले नाहींत, याबद्दल त्यांचें अभिनंदन करावयास हवें !
ऑल्डस हक्स्लेच्या कथेचा सोमणांचा हा अनुवाद सहजसुंदर उतरला आहे.

★ ★ ★

[लेखक परिचय—थॉमस हेन्री हक्स्ले या शास्त्रज्ञाचे हे नातु. यांचा जन्म २६ जुलै १८९४ रोजीं झाला. ईटन व ऑक्सफोर्ड येथें यांचें शिक्षण झालें. यांनी सर्व जगभर प्रवास केलेला आहे, असें म्हणावयाला हरकत नाही. काव्य, लघुकथा, कादंबरी, निबंध–इत्यादि सर्व प्रकारच्या वाङ्मयप्रकारांत त्यांनी यश संपादित केलें आहे. 'लिंबो' 'ब्रीफ कॅन्डल्स्' इत्यादि त्यांचे लघुकरण संग्रह वाचनीय आहेत. त्यांची पुढील लघुकथा आधुनिक लघुकथेचा निर्दोष नमुना म्हणून दाखवितां येईल.]

★

जवळ जवळ पाऊण तास झाला, पण त्यांचें तें भांडण चालूच होतें ! बंगल्यांतल्या त्या एकीकडच्या खोलींतून घोगरे, अस्पष्ट शब्द हवेवर वहून येत व गारठ्याने पूर्णपणें कब्ज्यांत घेतलेल्या सोफीच्या त्या लहानशा खोलींत किंचित् घुमत.

शिवणकाम करणाऱ्या सोफीचें अर्धें अवधान नेहमीप्रमाणें त्या भांडणाकडे होतें. तिच्या मालकिणीचा आवाजच तिच्या कानीं अखंड पडत होता. क्रोधामुळे एकेरी झालेल्या तार सप्तकांतल्या तिच्या आवाजांतला रडवेपणा ! मालकीण खास रडत होती ! तिच्या मालकाचा मात्र

स्वतःच्या रागावर पूर्ण ताबा असल्यासारखें वाटत होतें. गंभीर आवाजांत मधून मधून कांही शब्द तो उच्चारी; पण ते आवाज विशेष चढूं न देतां! दूर कुठे तरी एखादी कुत्री सारखी केकाटत आहे आणि ती म्हणजे आपली मालकीण, असें सोफीला वाटलें!

मालकिणीचें शिवणकाम होतें तें! तें बिघडून कसें चालेल? कांही वेळाने सोफीने सारें लक्ष्य हातांतल्या कामावर कसेंबसें एकाग्र केलें. किती थकली होती ती! दिवसभर अतोनात काम पडलें होतें ना तिला! सारें अंग ठणकत होतें तिचें! पण त्याच दिवसाचें कशाला? त्याच्या आधला दिवस?—तोहि तसाच! त्याच्याहि आधला दिवस?—तोहि तसाच तिचें एक आटवीत गेला होता! रोजच्र कूर काम पडे तिला! आणि आतां ती पूर्वीसारखी तरुण थोडीच होती? आणखी दोन वर्षे-म्हणजे झाली तिच्या वयाला पन्नास वर्षे पूर्ण! तिला कळायला लागल्यापासूनचें तिच्या आयुष्यांतले सगळे दिवस सारखेच होते. काम—काम—काम! शरीरांतलें हाड न् हाड दुखायला लागेपर्यंत काम! खेड्यांतलें तिचें लहानपण तिला आठवलें. बटाट्यांनी अर्धेंअधिक भरलेलें पोतें घरीं नेऊन टाकलें की, दुसरें-तिसरें! हळूहळू, ठेचाळत, अडखळत कशीबशी घरीं यायची ती दूर खेपेला! घर दिसायला लागलें की, ती म्हणे, "हं! आता फक्त शंभर पावलें अंतर—आता चाळीस—आता दहाच!! पण तेवढें पोतें रिकामें केलें की पुनः—?

मानेला हिसडा दिल्यासारखें करून सोफीने खिडकींतून दिसणाऱ्या बाहेरच्या जगाकडे पाहिलें व कपाळाला आठ्या घालीत डोळे गच्च मिटून घेतले. डोळे मिटले की, आताशा तिच्या दृष्टी-समोर काजवे चमकत पिवळे, हिरवे, लाल—कितीतरी रंगांचे असत ते! आणि डोळे उघडले तरी मग बराच वेळ ते डोळ्यांसमोर तसेच तरळत रहात! आताहि तिने डोळे उघडले तरी पुढ्यांतलें शिवण त्यांनी आच्छादून टाकलें होतेंच; तिने पुनः सुई चालवायला सुरवात केली. आजच्या आज तें सारें शिवण पुरें व्हायलाच हवें होतें. मालकिणीची ताकीदच होती तशी!

पलीकडील भांडण आता एकदम खूपच वाढलें होतें. मालक आणि मालकीण दोघेंहि आता किंचाळत होतीं. थोड्याच वेळाने एक दरवाजा धाडकन् उघडल्याचा आवाज झाला!

"मी निघूनच जातें मुळी घरांतून!"

"जा, चालती हो!" मालक ओरडला. नंतर पावलांचा दण्दण् असा आवाज आला, छत्र्या ठेवायच्या स्टँडचे कुणी तरी हाल केलेले सोफीने ऐकले आणि बंगल्याचा पुढील दरवाजा निखळून पडेल इतक्या जोराने लावला गेला!

सोफीने पुनः शिवायला आरंभ केला. ते रंगी बेरंगी काजवे कापडावर अजून हिंडत होतेच. शरीरांतलि प्रत्येक शीर, प्रत्येक रक्त-बिंदुदेखील जसा कांही ठणकत होता आता!

टिण् ऽ टिण् ऽऽ टिण् ऽऽऽ!

—घंटेच्या आवाजाने ती भानावर आली. मालकीण बोलावीत होती तिला. तिने हातांतलें शिवण टेबलावर ठेवलें, वेष सावरला आणि खोलीबाहेर पाऊल टाकलें.

"आलीस एकदाची!"

सोफी कांहीच बोलली नाहीं. बोलायचें तरी काय?

कपडे ठेवायच्या कपाटासमोर मालकीण उभी होती; तिच्या खांद्यावर कांही कपडे आडवे टाक-लेले होते; आणि कपड्यांचा एक उंच ढीग बिछान्यावरहि पडलेला दिसत होता.

फारच सुरेख दिसत होती तिची मालकीण आज! अगदी गुलाबी झालेले ते दोन्ही गाल, मुद्दाम वळवलेल्या लांब पापण्यांतून बाहेर पडणारें तिच्या निळसर डोळ्यांतलें तें तेज, गंजलेल्या लोखंडाच्या रंगाचे ते विस्कटलेले केस—मोहक!

प्रेम करायची लहर आली म्हणजे तिचा नवरा तिला म्हणे, "व्हेनिसच्या चित्रांतील सजीव झालेली रमणी म्हणजे तूं!"—अगदी खरें होतें तें!

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"सोफी ! उद्या रोमला जायला निघायच आपल्याला !"– हातवारे करीत तिची मालकीण म्हणाली– "उद्या सकाळीं !!"– आणखी एक झगा कपाटांतून फरकन् ओढून तिनें बिछान्यावर टाकला.– "सामान बांधायला लागलं पाहिजे आतापासून आपल्याला !"

"किती दिवसांकरिता जायचं ?"

"पंधरा दिवस–तीन महिने–कायमचं ! तें कसं आज सांगतां येईल ? !"

"किती दिवसांकरिता जायचं, हें कळलं असतं, म्हणजे तशी तयारी करतां आली असती !"

"इथून जायचं हें पहिलं काम ! आजच्या भांडणानंतर त्यानें क्षमा मागितल्याशिवाय पाय टाकायची नाही मी या घरांत !"

"मोठी ट्रंक घेऊन येतें मी सामान भरायला !"

अडगळींच्या खोलींत एका कोपऱ्यांत ती अवजड ट्रंक होती. खोलींतल्या कुबट घाणींने सोफीचें डोकें गरगरायला लागलें. ती ट्रंक काढून मालकिणीच्या खोलींत आणीपर्यंत तिच्या डोळ्यांसमोर सारखे काजवे तरंगत होते. तेच ते वार्धक्यसूचक हिरवे, पिवळे, लाल काजवे !

"मी मदत करतें, सोफी, तुला !"

तिच्या सुंदर मालकिणीला कुरूप स्त्रियांचा तिटकारा येई. आणि सोफी – किती कुरूप दिसायला लागली होती ती अलीकडे ! निस्तेज डोळे, गालांचीं हाडें वर आलेलीं, प्रेतासारखा निस्तेज चेहरा ! - शीः - पण सोफीसारख्या प्रामाणिक, कामसू स्त्रीला नोकरीवरून काढणें म्हणजे हालच ! तिला नोकरीवरून दूर करणें शक्यच नव्हतें.

"एवढ्याशा कामांत कशाला हवी मदत ? आत्ता आटोपतें मी सारं ! तुम्ही कशाला उगाच श्रम करतां ! !"

मालकिणीची मदत सोफीच्या पूर्ण परिचयाची होती. एकपट कामाची शतपट दुर्दशा, अर्थात् सोफीलाच पडणारें शतपट काम, निष्कारण लाखों लागणारीं बोलणीं ! – त्यापेक्षा सारें काम एकटीनें करणें पुरवलें !

"शक्य तरी आहे कां आज मला झोप येणं ? तो काय म्हणाला ठाऊक नाही तुला ! मी उधळी आहे, मी कपड्यांत निष्कारण पैसे खर्च करते, तो कफल्लक झाला आहे. ––काय वाटेल तें बडबडत होता ! ! आणि, तेंहि सारं खोटं ! भरपूर कपडे नकोत कां मला ? दिवसभर त्याच्या त्या कविता खरडीत बसतो आणि मग त्यांचीं पुस्तकें स्वत: प्रसिद्ध करण्यांत पैसा खर्च करतो ! माझ्यासाठी खर्च करायला मात्र पैसे नाहीत त्याच्याजवळ ! नसतील तर आपल्या त्या थेरड्या बापाकडून आण म्हणावं ! त्याचा दुसरा उपयोगच काय आहे आम्हाला ?––म्हणे 'मी कवि आहे याचा तुला अभिमान वाटायला हवा !'––हंसत होता माझ्याकडे पाहून हें म्हणतांना ! वाटतोय् मला असल्या आळशी, टक्कल पडलेल्या नवऱ्याबद्दल अभिमान ! वाट बघ म्हणावं.''''' ! !"

सोफीची मालकीण सोफीचें अस्तित्व विसरून बोलत होती, पण मध्येंच तिचें लक्ष सोफीकडे गेलें.

"सोफी ! वेड लागलेलं दिसत आहे तुला ! अग, तो हिरवा झगा कशाला बरोबर ? मला अगदी आवडत नाही तो आजकाल ! कसं कांहीच कळत नाही तुला ?"

"असह्य झालं आहे हें जीवन ! !" एक दीर्घ उसासा टाकून मालकीण त्या मऊ गादी टाकलेल्या पलंगावर बसली.

सोफीनें तिच्याकडे पाहिलें. त्या पलंगावर, त्या मऊ, ऊबदार गादीवर दिवसभर फक्त एकच दिवस स्वस्थ झोपायला सांपडेल तर–– !

"कसा वागवतो बघ ना मला !" पुन्हा "आवेशानें मालकीण उठली, व खोलींत येरझारा घालूं लागली." अशा मनुष्याची बायको होणं म्हणजे यातना ! – हाल !! सहन करणार नाही मी हें ! मला जीव नाही का ? !"

एका मोठ्या आरशासमोर मालकीण उभी राहिली. स्वत:च्या सुरेख प्रतिबिंबापलीकडे तिला कुरूप सोफीचें प्रतिबिंब दिसत होतें. ट्रंकेवर

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाकली होती ती ! बघवेना तिला त्या प्रतिबिंबा-कडे ! किती भयानक दिसत होती सोफी ! थंडीच्या दिवसांत एखादी भिकारीण रस्त्याच्या कडेला चमत्कारिक मुद्रा करून उभी असते, अगदी तस्सा चेहरा दिसत होता सोफीचा ! ती भिकारीण टाळून कांहीजण पुढे जातात, कांही-जण तिच्या दिशेने एखादें नाणें फेकतात ! पण कांही केलें, तरी तिची ती विलक्षण नजर किती-तरी वेळा उगाचच पुन: पुन्हा आठवते ! म्हणून तर मोटार हवी; दर्शनच नको त्या भिकारणींचें !!

सोफी उठून टेबलाजवळ गेली. उठतांना तिच्या दोन्ही गुडघ्यांतून केवढ्यांदा तरी कळ चमकून गेली. तथापि ओठ दातांखाली दाबून तिने ती सहन केली. टेबलाच्या खणांतून पाय-मोज्यांच्या सहा जोड्या तिने काढल्या. मालकीण मान वळवून तिच्याकडे पहात होती !! छे ! कुठेहि गेले तरी सोफीचा विलक्षण, भकास चेहरा सारखा डोळ्यांसमोर खास दिसणार ! नको हें जीवन !!

सोफी ! स्वच्छ तोंड धुऊन ये आणि टेबला-वर माझा पॉवडरचा डबा आहे, त्यांतली थोडी फास जा गालाला ! आणि जवळच 'लिप स्टिक' आहे माझी, ती तुलाच घे ! जा !!

—थोड्याच वेळांत सोफी परत आली.

"बरी दिसते आहेस आता थोडी तरी ! बघवत नव्हतं मघाशी तुझ्याकडे ! आटप आतां चट्‌चट् ! तो बघ तो निळा झगा—अग, तो बरोबर नको का घ्यायला ? किती मूर्ख आहेस सोफी तूं !! तुम्ही सर्वांनी असह्य केलंत् आहां माझं जीवन !! असह्य ! असह्य !!"

सोफी पुन: कामाला लागली !

◇ ◇ ◇

वेडा

मूळ लेखक : जॉर्ज ए. बर्मिंगहॅम
अनुवादक : पद्माकर निमदेव, बी. ए.

● रा. निमदेव हे उदयोन्मुख लघुकथा लेखक म्हणून विदर्भास परिचित आहेत. स्वतंत्र लघुकथा लेखनाप्रमाणें ते सरस भाषांतरहि करूं शकतात, याची साक्ष या कथेवरून पटेल.

★ ★ ★

मंगळवारचा दिवस होता. डयूनैलिन येथे हा दिवस म्हणजे जवळ जवळ विश्रांतीचाच म्हणांना !

डॉ. लोव्हवे आपला फराळ आटोपून बसले होते. त्यांना वाटलें—आज आपल्याला फारसें काम राहणार नाहीं. त्यावेळेस बाहेर पाऊस ओतत होता. पण डॉक्टरांना मात्र त्यापासून कोणताच उपसर्ग पोचत नव्हता. त्यांच्या कार्यक्रमांत पावसा-मुळे कांहीच विघ्न येणार नव्हतें.

त्यांनी टेबलाजवळ खुर्ची ओढली. एकदोन कागद समोर धरले आणि, लिहावयास सुरवात केली. 'ब्रिटिश मेडिकल जर्नल' या नियतकालि-काला एखादा आरोग्यविषयक लेख लिहून पाठवावा, असें त्यांच्या मनांत होतें. डयूनैलिन येथे जवळ जवळ त्यांनी तीन आठवडे घालविले होते. आणि, तेथील 'वेड्या' लोकांना औषधें देण्यांत त्यांचा सर्व वेळ खर्च होत होता. बहुधा सार्जंट रॅहिली डॉ. ची भेट घेऊन एखाद्या मनुष्या-बद्दल त्यांच्याकडून वेडेपणाचें सर्टिफिकेट घेई आणि डॉ. नी तें दिलें म्हणजे त्याची रवानगी तो वेड्यांच्या इस्पितळांत करीत असे. डॉ. एक-दम सर्टिफिकेट देत नसत. पण सार्जंटकडून व त्याच्या त्या कॉन्स्टेबलकडून त्या वेड्यासंबंधीं एवढी चिकार माहिती सांगितली जाई की, मग त्यांना सर्टिफिकेट देणें भाग पडे !

या ठिकाणीं हे एवढे 'वेडेपीर' एवढ्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रमाणांत का असावे, याचा डॉ. ना मात्र विचार पडे. त्याची कारणमीमांसा शोधून काढण्याचा ते प्रयत्न करीत. गचाळ चहा, आंतरजातीय विवाह, फार दारू पिणें, धर्मावरील अंधश्रद्धा—यांपैकी कोणतें तरी कारण असावें, असें त्यांना वाटे! या आयरिश वेड्यांचें कारणच त्यांना उमगेना!

तेवढ्यांत दारावर थाप पडली; मॅलोन नांवाचा कॉन्स्टेबल त्यांच्याकडे आला होता. चांगला उंचापुरा होता तो! पावसांतून आल्यामुळे त्याचे कपडे ओलेचिंब झाले होते.

तो डॉ. ना म्हणाला "मला सार्जंट साहेबांनी आपणांकडे धाडलें आहे आज दुपारीं एकाचा वेडेपणा शाबित करण्याकरिता आपण बॅलीग्रॅनला येऊं शकाल काय?"

"हो—" डॉ. उत्तरलें.

"मीच तर त्या वेड्याला शोधून काढला!" तो कॉन्स्टेबल मोठ्या प्रौढीने सांगूं लागला, "आपल्याला नेण्याला गाडी तयार ठेवतों; कारण बॅलीग्रॅन जरा एकीकडे आहे आणि पाऊस तर कांही ऐकत नाही!"

"त्या वेड्याची मजल दगड फेकण्यापर्यंत गेली कां?"—डॉ. नी प्रश्न केला.

कॉन्स्टेबल सांगूं लागला, "त्याचं नांव आहे जीमी. तो आपल्या बापाला शेतीच्या कामांत मदत करतो. पण सध्या हंगाम संपल्यामुळे जरी तो वेड्यांच्या इस्पितळांत दाखल झाला, तरी त्याच्या बापाचें तसें कांही नुकसान होणार नाही."

पण या त्याच्या स्पष्टीकरणाने डॉ. चें समाधान झालें नाही.

त्यांनी पुन्हा प्रश्न केला, "तो वेडा कुणाला दगड वगैरे मारतो का?"

"आज तो शांत दिसतो, पण उद्या कदाचित् गोटे मारणार नाही कशावरून!"

"कां बुवा? उद्याच कां म्हणून?"

"कारण उद्या चंद्राची कला बदलते आहे. आणि, असं म्हणतात की चंद्राच्या वाढत्या कलेबरोबर या वेड्यांच्या वेडांत चांगलीच भर पडते!"

डॉ. त्याच्याशीं फारसे बोललेच नाहीत मग!

दुपारी दोन वाजतां डॉ. लोव्हवे, कॉन्स्टेबल मॅलोन, आणि सार्जंट रॅहिली असे तिघे गाडींत बसून बॅलीग्रॅनकडे निघाले.

बॅलीग्रॅन हें गाव अतिशय एकीकडे होतें. टेकड्यांतून तेथे जावें लागे. गाव आता एक मैल आहे, असें तो कॉन्स्टेबल वारंवार सांगे. पण मैलामागे मैल गेला, तरी गावाचा पत्ता नाही, हें पाहून डॉ. ना त्या आयरिश मैलाची मोठी गंमत वाटली!

शेवटी एकदाचें ते पोंचले. एक स्त्री उभी होती त्या झोपडीपाशीं ते आले. तिच्या मागे एक उंचेलेसा मनुष्य उभा होता.

ती बाई म्हणाली, "या, आंत या." नंतर सार्जंटकडे वळून ती म्हणाली, "एवढ्या पावसांत तुम्ही डॉ. ना आणलें, हं! थांबा, मी चहा करतें. तोपर्यंत तुम्ही विस्तवाशीं बसा"—

डॉ. झोपडींत वाकून शिरले. खोलींत अंधार होता व धूरही कोंदाटला होता. एका कोपऱ्यांत लहानशा स्टुलावर विस्तवापाशी एक तरुण बसलेला त्यांना दिसला.

ती स्त्री म्हणाली, "हाच तो माझा मुलगा. सार्जंटनं तुम्हांला सर्व कांही सांगितलंच असेल?"

आवाज ऐकल्याबरोबर तो मुलगा उठून उभा राहिला. ती बाई त्या मुलाला म्हणाली, "जीमी, हे डॉ. आले आहेत." जीमी म्हणाला, मी तुमचं स्वागत करतों, डॉक्टर."

सार्जंट मध्येंच म्हणाला, "जीमी, हे डॉ. तुला तपासायला आले आहेत. तुझ्या हिताकरिताच त्यांना आणलं आहे."

जीमी म्हणाला "तें मला ठाऊक आहे! मला वेड्यांच्या इस्पितळांत पाठविण्याकरितां हे आले आहेत! ईश्वराची जर तशी इच्छा असेल तर तेंहि शक्य आहे."

सार्जंट म्हणाला— "पाहिलं डॉक्टर, मी कागदसुद्धा आणले आहेत आपल्या रिपोर्टाकरितां आणि सहीकरितां"

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

डॉ. लोव्हवे पाहतच राहिले! त्यांना त्या मुलांत वेडेपणाचा अंशहि दिसत नव्हता!

त्या मुलाची आई—म्हणजे ती बाई—म्हणाली "कधी कधी हा बोलतच नाही! आणि, आपण बोललों, तर तिकडे लक्षहि देत नाही. मात्र तो बसल्या बसल्या कांही तरी उद्योग करतो. कुठं डुकराला खायला घाल, तर पडक्या भिंतीला लिंपूनच काढ."

सार्जंट त्या बाईला म्हणाला, "बाई, तुम्ही कशाला एवढं बोलतां? डॉ. ना सारं कळतं! त्यांना फक्त रिपोर्ट व त्यावर सही करूं द्या! कारण आम्ही पावसानं अगदी भिजून गेलों आहोंत!"

ती बाई चहाच्या तयारीला लागली.

डॉ. थोडेसे गोंधळून गेले! इस्पितळांत पाठविण्याइतकें वेड त्या मुलाला खास लागलें नव्हतें, अशी त्यांची खात्री झाली! पण सार्जंटने रिपोर्टचे कागद एवढ्या त्वरेने का पुढे करावे आणि कॉन्स्टेबलने एवढ्या एकीकडच्या भागांतला मुलगा कसा अचुक शोधून कढावा, याचा मात्र त्यांना अचंबा वाटूं लागला!

डॉ. म्हणाले, "या मुलाला इस्पितळांत पाठवावें, असें मला वाटत नाही!"

मुलाचा बाप म्हणाला, "तो तसा शांत, गरीब आणि चांगला आहे."

"मलाहि तर तसंच वाटतं" डॉ. उत्तरले.

त्या मुलाने बिस्तव फुंकण्याचें सोडून आजूबाजूला पाहिलें. तो म्हणाला, "तुम्हाला माझी रवानगी करावयाची आहे ना?"

सार्जंट मध्येच म्हणाला, "तुझ्या बऱ्याकरिताच"

बाप म्हणाला, "त्याला जर पाठविलं नाही, तर तो इथं कांही फार त्रास देईल, असं नाही वाटत मला."

सार्जंट म्हणाला, "पण त्याला पंधरा दिवस फार तर तेथे राहावें लागेल!"

बाप म्हणाला, "मला नाही त्याला जास्त दिवस तिथे ठेवणं परवडणार! हंगामापूर्वी तो माझ्या हाताशीं पाहिजे. फार तर खिसमस्‌पर्यंत मी त्याला ठेवीन!"

डॉ. निश्चयपूर्वक बोलूं लागले, "हा मुलगा वेडा आहे, असं सर्टिफिकेट मी कधीच देणार नाही!"

सार्जंट म्हणाला, "डॉ. इतक्या लांब आल्यावर एका साध्या कागदावर सही करायला काय हरकत आहे? पुन्हा जीमी तेथे राहण्याला तयार आहे!"

जीमी म्हणाला, "मला जाणें अवश्य असेल तर मी जाईन!"

मुलाच्या आईकडे वळून डॉ. नी प्रश्न केला, "बाई, मुलाला वेड्यांच्या इस्पितळांत पाठवावं, असं तुम्हांला वाटतं का हो!"

आश्चर्याने ती म्हणाली, "मला? – कोण म्हणतं, मला? सार्जंटला दुखवूं नये, म्हणून मी 'हो' म्हटलं!"

बाप म्हणाला, "जर मुलगा फार दिवस तेथे राहावयाचा नसेल, आणि तो जर जावयाला तयार असेल, तर —"

जीमी म्हणाला, "मी जायला तयार नाही, असं थोडचं आहे?"

सार्जंट म्हणाला, "पहा, डॉ. साहेब मुलगा जर जावयाला तयार आहे, तर तुम्ही कशाला मोडता घालता?"

डॉ. म्हणाले, "सार्जंटसाहेब, तें कदापिहि शक्य नाही! तुम्ही मला असें करावयास का भाग पाडता, तेंच मला समजत नाही! मला तर वाटतं की, —"

डॉ. ना वाटलें की, निष्पाप मनुष्याचें स्वातंत्र्य नष्ट करण्याच्या कारस्थानांत आपलें सहाय्य याला हवें आहे! —

"सार्जंट, तुम्ही मला येथे आणण्याची गरजच नव्हती! मला या गोष्टीचा रिपोर्ट तुमच्या वरिष्ठाकडे करावा लागेल!"

"डॉ. आपणाला त्रास द्यावा, असें मला मुळींच वाटलें नाही!"

"पण असं वागण्याची ही तुमची पहिलीच वेळ नाही! संशयातीत इसमालासुद्धा वेड लागलं आहे, असं तुम्ही माझ्याकडून अनेकदां लिहवून घेतलं आहे! तुमचा उद्देशच माझ्या लक्षांत येत नाही!"

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि; नंतर ते तिथे गाडींत बसून परत आले.

आणि, त्याच रात्रीं —

फ्लॅनगन नावाच्या इसमाकडे तोच सार्जंट गेला. त्याने दोन ग्लास दारू झोकली आणि म्हणाला, " या लोव्हवे डॉक्टरचा मला अचंबा वाटतो! या लोव्हवेला मी नेहमी केसेस देतों— "

" अलवत "—फ्लॅनगन म्हणाला.

" डोक्यांत थोडीशी विकृती असलेल्या लोकांचा आम्ही तलास लावतों. पण एका सर्टिफिकेटाकरिता डॉ. ना एक गिनी मिळते, आणि माझ्यासारख्याला किंवा कॉन्स्टेबल-सारख्याला फक्त एक पेनीचीच प्राप्ती होते! "

" आणि, आपण काय हो त्या पेनीकरिता भुकेले आहां! " फ्लॅनगन म्हणाला.

" मला नाही मिळालं, तरी चालेल! पण आम्ही आपले रावा आणि यांना पैसे मिळवून द्या! – पण ते सुद्धा द्यायला हा डॉक्टर तयार नाही!! आम्ही दाखविलेल्या अर्ध्या-अधिक लोकांना त्याने सर्टिफिकेटं दिलीं नाहींत! " – थोडावेळ थांबून तो म्हणाला, " बरं, आजचंच पहाना; दुसऱ्या गावची त्या मुलाची ती केस होती. चांगल्या दोन गिनी मिळाल्या असत्या त्या डॉ. ला. पण हा गुन्हा आहे, असं म्हणून तो मोकळा झाला! म्हणे, व्यक्तिस्वातंत्र्य नष्ट होतं! फ्लॅनगन, तूंच सांग, यांत कुठं स्वातंत्र्य नष्ट होतं? "

" छे, छे! अहो, कांही दिवसांकरिता तो मुलगा पाठविला असता, तर त्यांत काय पाप होतं? " – फ्लॅनगन म्हणाला.

" तेंच तर मी त्या डॉ. ला सांगत होतो! जणू माझ्याच खिशांत त्या दोन गिनी पडणार होत्या? " – सार्जंट तावाने म्हणाला.

फ्लॅनगन म्हणाला, " सार्जंटसाहेब, मला खरंच वाईट वाटतं. पण वस्तुस्थिति तशी आहे खरी! मी मागे तुम्हाला सांगितलं होतं आणि आता पुन्हा तेंच सांगतों; इंग्रज लोक हे विलक्षण असतात! तुम्ही त्यांना जास्त खूप करण्याचा प्रयत्न केला आणि पुढे पुढे केलें, तर त्यांना तुम्ही क्वचितच आवडतां! इंग्रजांशी वागणं ही कांही सोपी गोष्ट नाही! – आणि, मी म्हणतों तें खरं आहे! "

● ● ●

(लघुतम-कथा)

मृत्यूची मुलाखत

लेखक : सॉमरसेट् मॉम्
अनुवादक : प्रा. भा. म. गोरे, एम्. ए.

● प्रा. भा. म. गोरे यांचा 'युगवाणी' च्या वाचकांस उत्तम परिचय आहे. त्यांनी सॉमरसेट मॉम् यांच्या लघुतमकथेचा केलेला हा अनुवाद नेहमीप्रमाणेच चटकदार आहे.

★ ★ ★

[लेखक परिचय—गोड गोड खाऊन विटलेल्या लोकांना कांही कडवट, खारट, तुरट, खावेंसे वाटतें. पश्चिमात्य लोकांत अशा कामासाठी कडू चाकोलेटचा उपयोग करतात. सोमरसेट् मॉम्च्या वाङ्मयाची रुचि अशा कडू चाकोलेट सारखी आहे, असें म्हणतां येईल. नाटककार, कथालेखक आणि कादंबरीकार या तीन्ही नात्यांनी मॉम् यांनी इंग्रजी साहित्याची सेवा केली, आणि एक नवीच पद्धति, नवीच रुचि उत्पन्न केली. त्यांच्या लेखनाचे गुण एकाच शब्दांत सांगावयाचें असेल, तर 'Tang' (चटका) हा शब्द वापरावा लागेल. 'Of Human Bondage' व 'Cakes and Ale' या त्यांच्या कडू-गोड कादंबऱ्या फार लोकप्रिय आहेत. त्यांच्या मार्मिक व मर्मभेदक नाटकांनी आधुनिक रंगभूमि गाजविली. त्यांच्या

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लघुकथांत सामान्यांपेक्षा असामान्यांचें चित्रण अधिकदा आढळतें. ' Cosmopolilana ' हा त्यांचा लघुतमकथांचा संग्रह प्रसिद्ध आहे. या संग्रहाशिवाय त्यांच्या इतर अनेक लघुतमकथा इतस्ततः प्रसिद्ध झालेल्या आहेत. भावनावशतेचा आणि रूढ नीती व जीवनमूल्यें यांचा उपहास; जरा कृत्रिम, वोचक पण घोटीव सफाईदार शैली हे मॉमच्या लेखनाचे डोळ्यांत भरणारे विशेष होत.]

★

बगदाद शहरांतील एका व्यापाऱ्याने आपल्या नोकराला बाजारांतून कांही सामान आणण्यास पाठविलें. थोड्या वेळाने तो रिकाम्या हातांनीच परत आला. त्याचें तोंड खडूसारखें पांढरे फटक पडलें होते. तो थरथर कापत मालकाला म्हणाला "मालक! तुमचा सर्वांत चपळ असा घोडा मला द्या. मला तावडतोब 'समारा' शहराला गेलं पाहिजे–बगदाद मधून निसटलं पाहिजे!"

मालकाने प्रश्न केला–"अरे, पण घाबरलास का इतका? झालं तरी काय!"

नोकर म्हणाला "मी बाजारांत गेलों असतां गर्दीत मला एका माणसाचा धक्का लागला. मी मागं वळून त्याच्याकडे पाहिलं, तर तो प्रत्यक्ष यम होता!–साक्षात् मृत्यू! त्याने माझ्याकडे पाहून अशी कांही मुद्रा केली की, मी ती पाहूनच अर्धमेला झालों. आता मला नाही रहावत या शहरांत! दूरच्या 'समारा' शहरांत तरी पळून जातों—तिथं शोधूनहि सापडायचा नाही मी त्याला—बैस म्हणावं मला शोधीत बगदादमध्ये!"

त्या व्यापाऱ्याने आपल्या नोकराला एक घोडा दिला. त्यावर स्वार होऊन, तो टाचा मारीत भरधांव निघून गेला.

आपलें सामान आणण्यासाठी त्या व्यापाऱ्यालाच स्वतः संध्याकाळीं बाजारांत जावें लागलें. तेथे तो यम–साक्षात् मृत्यू–लोकांच्या घोळक्यांत उभा असलेला त्याला दिसला. तो त्याजवळ जाऊन त्याला म्हणाला–"सलाम आलेकुम! काहो! माझ्या नोकराला तुम्ही आज सकाळीं अगदीं भिवून सोडलंत?"

मृत्यू म्हणाला–"छे! मी कुठे त्याला भिवविलं? मी त्याला कसलाहि धाक दाखविला नाही. तो बगदादमधे दिसल्यावर मला अत्यंत आश्चर्य मात्र वाटलं, हें खरं. तेंच दिसलं असेल माझ्या चेहऱ्यावर."

—"आश्चर्य? कसलं आश्चर्य!" व्यापाऱ्याने विचारलें.

मृत्यूने उत्तर दिलें–"अहो, आज रात्रींच दूरच्या 'समारा' शहरांत त्याची माझी गांठ पडावयाची, असं विधिलिखित होतं–अन् सकाळीं पहातों, तर हा बगदाद मध्येच–मग विधिलिखित खोटं ठरतंय् की काय या विचाराने मी गोंधळलों होतों...(..... काहो काय झालं? आता तुम्हाला कसलं आश्चर्य वाटलं यांत!)

✧ ✧ ✧

(नाट्य छटा)

नकोरे मला देव करूस

व्यंकटेश वकील, बी. ए.

● सुप्रसिद्ध साहित्यिक रा. व्यंकटेश वकील यांनी ललित–वाङ्मयाच्या जवळ जवळ सर्वच शाखांत अत्यंत यशस्वितेने संचार केलेला आहे! त्यांची ही सरस नाट्यछटा त्यांच्या बहुरंगी लेखणीचा प्रत्यय आणून देते.

✻

(नाट्य-छटा)

—पांथस्था, क्षमाकर, ठेंच लागून तुझा जीव कासावीस झाला याची क्षमाकर. तुला त्रास झाला याची मला खंत वाटते. खुशाल माझ्यावर रागाव, आणि वाटेंतून लांब कुठंतरी भिरकावून दे– माझ्याकडं आश्चर्यानं कां बरं बघत आहेस?–

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होय, होतो मी एकेकाळी एक देवमूर्ति !– होय तीच मी खंडित मूर्ति !– पण त्याचं आतां काय ?– चकित झालास पांथस्था ?– नाहीं मला माझ्या स्थितीबद्दल जरा देखील वाईट वाटत नाहीं. उलट या असंख्य धूलिकणांच्या सहवासांत मी गोड अनुभव घेत आहे. नाहीं, जुने अनुभव मला सुखाचे वाटत नव्हते. पण त्याचं आतां काय ?– तेव्हां गळ्यांत पडलेले हार आता निर्माल्य झालेले आहेत. तेव्हां चरणीं टेकलेलीं मस्तकें आतां माझ्या सारखींच मातींत मिसळलीं असतील–तेव्हा झालेले प्रचंड जयजयकार आता ह्या गगनाच्या निळ्या घुमटींत विलीन झालेले आहेत. त्या वेळच्या लक्ष लक्ष अंतःकरणामधल्या श्रद्धा आतां मरून गेलेल्या असतील.–एका कटु-सत्याच्या सुजाण जाणीवेनं जागृत झालेलीं अंतःकरणं आतां तर्कशुद्ध सिद्धांतांनीं न्हाऊन ताजींतवानीं झालेलीं आहेत. एका विशाल वेदनेनं पीडलेल्या एका सत्याग्रह्यानं माझीं खांडोळीं केलीं. त्यानं माझी बंदीवासांतून सुटका केली. परंपरेच्या जाचां-तून त्यानं मला मुक्त केलं. —होय, माझी खांडोळीं करणारा तो सत्याग्रही क्षुब्ध अज्ञानाला बळी पडला, हें खरं आहे. पण त्याचं जीवन सार्थकी लागलं, उपकार झाले त्याचे माझ्यावर !

पांथस्था, चकित होऊं नकोस. खोट्या देवत्वा-पासून सुटका झाल्यामुळं मी आतां खरंच सुखी झालों. नाही, जरा देखील मला खंत वाटत नाही, तिळमात्र देखील वेदना झाल्या नाहीत. त्याचे घाव मला पुष्पमालेपेक्षां मृदू वाटले.— नाही, पाषाणराज सह्याद्री माझा पूर्वज असल्याचा तिळमात्र देखील अभिमान मला वाटत नाही. भारतीय कलासौंदर्याचं प्रदर्शन माझ्या प्रतिमा-स्वरूपांतून होत होतं, याचाहि मला गर्व वाटत नाही. भारतीय आंधळेपणाच्या आणि अज्ञानाच्या प्रचंड प्रदर्शनानं मात्र मी भारावून जात असे. धर्माच्या नांवाखाली जनतेला आडवाटेनं नेणारे चकवे पुजारी माझी षोडषोपचारांनीं पूजा करीत होते, पण त्याचाहि आतां मला लोभ वाटत नाही. नाही, शिल्पकारानं आपल्या कलेची परमावधि करून, मला देवकळा आणली याचाहि अभिमान मी कधीं बाळगला नाही. कलेला जीवनापासून पारखं करून, नवनवीन असत्यं निर्माण करणाऱ्या कलावंताचं कौतुक मला वाटत नाही. माझ्यापुढं नर्तन करणाऱ्या नर्तकीच्या कलात्मकतेचं कौतुक मला वाटलं नाही. माझ्या ठायीं प्रीति करणाऱ्या जीवांचा मला तिटकारा वाटत होता. जीवनाला विसरून असत्याच्या मृगजळामागं लागलेल्या त्या कलावंतांची मला कीव येते. नको, पांथस्था नको, मला मोहांत पाडूं नकोस. माझ्यावर दया कर, हा तुझा शेंदूर लावून मला विद्रूप करूं नकोस. मला नुसता दगडच राहूं दे ! मी तुझा कांहीहि अपराध केलेला नाही. —ह्या वाटेवर पडल्यामुळं माझी तुला ठेंच लागली हें खरं आहे पण त्यामुळं शहाणं व्हायचं सोडून असा वेडेपणा करूं नकोस. शहाणा हो बाबा, मला शेंदूर फासून पुन्हा एक नवं असत्य निर्माण करूं नकोस. तूं जीवनावर केवढा अत्याचार करतोस, याची तुला कल्पना तरी आहे कां ?–आपल्या कटु जीवनाची जबाबदारी नशिबावर लादणारे हे अज्ञानी गाव-करी अधिकच भांबावतील. त्यांना आपल्या दुर्दैवाचं आणखी एक खोटं नवं दर्शन माझ्या शेंदरी स्वरूपांत घडवूं नकोस. दया कर, पांथस्था, दया कर. हे सोन्यासारखं शेत बघ. जीवनदात्री धरित्री प्रसन्न झाली तरी हा ओहळ त्यांतली माती चोरून लुटून नेतोच. ती लूट थांबविण्यांत मला मदतीला जाऊं दे–मातीचं हें शोषण थांबविण्या-साठी, पांथस्था, कृपा कर आणि मला त्या लोटाच्या दराडीवर नेऊन ठेव. मला त्या वाहून जाणाऱ्या सोन्यासारख्या मातीचं रक्षण करतां येईल.

नकोरे, पांथस्था !!–तुझं देवपण मला नकोसं झालेलं आहे आतां. या धूलिकणांची माझ्यावर ममता बसलेली आहे. या मातीचा कण नि कण मला आतां समतेची हांक मारीत आहे. त्यांच्या-पासून मला वेगळं करूं नकोस ! कुठल्या तरी अंधःकारमय काळोख्या कोंडींत नेऊन मला बंदिस्त करूं नकोस. ह्या सुंदर निळ्या आकाशाचं दृष्टिसुख माझ्यापासून हिरावून घेऊं नकोस. क्षितिजाच्या पार्श्वभूमीवर चितारलेली ही रमणीय

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वनश्री, तिच्यापासून मला वंचित करूं नकोस. पक्ष्यांच्या थव्यांनी गायलेली गोड गीतं मला आवडतात. त्यांच्यापासून मला लांब नेऊं नकोस.–पांथस्था, हात आवर! तुला ठेंच देऊन मी तुझा भयंकर अपराध केला. याबद्दल वाटल्यास माझे तुकडे तुकडे कर, पण मला शेंदूर फांसूं नकोस. तुला कल्पना नाही रे, पण पुन्हां तीं आंधळ्या श्रद्धेनं भारावलेलीं सुखदुःखं माझ्या चरणीं हिरानं येऊन पडतील! पुन्हा ते केविलवाणे नवस आणि खोट्या आशा यांची भुतावळ माझ्याभोवती नाचूं लागेल. नकोरे, पांथस्था, नको–अहो कुणीतरी धावा हो आणि मला देव होण्यापासून वांचवा, वांचवा...वांचवा. पांथस्था! नको रे मला देव करूंस!–पांथस्थाऽऽ......

• • •

संशोधकाचें पान

संग्राहक : डॉ. य. खु. देशपांडे, एम्. ए., एल्एल्. बी., डी. लिट्.

● 'संशोधकाचें पान' या सदरांत संशोधन विषयक मजकूर शक्य तों मूळ साधनासह, देण्यांत येईल. हें संशोधन प्रमुखपणे इतिहास व प्राचीन वाङ्मय यांच्या संबंधींचें असेल.

★ ★ ★

बाजीराव पेशवा (दुसरा) यास त्याची पत्नी वाराणशीबाई हिचें पत्र.

[सुप्रसिद्ध संशोधक डॉ. य. खु. देशपांडे लंडन येथे असतां तेथील ब्रिटिश म्युझियममधील अनेक कागदपत्रांचीं त्यांनी टांचणें केलीं. तीं यवतमाळच्या 'शारदाश्रमांत' ठेवलेलीं आहेत. त्यांतून पुढील पत्र नकलून घेतलें आहे.

हें पत्र दुसरा बाजीराव पेशवा यास त्याची पत्नी वाराणशीबाई हिने लिहिलेलें आहे. पत्र मोडींत असून त्याचा कागद शोभिवंत केलेला आहे. पत्नीने पतीस लिहिलेलें हें पत्र असल्यामुळें त्यांत शृंगारभावना प्रगट होणें साहाजिकच आहे. प्राचीन काळींहि पति–पत्नींचा प्रेमविषयक पत्रव्यवहार कसा होत असे, याचा नमुना म्हणून हें पत्र येथे देण्यांत येत आहे.]

★

माहाराजांचे सेवेसी सौभाग्यवती [१]वाराणसीन (ने) चरणावर मस्तक ठेवून नमस्कार विज्ञापना. फाल्गुन वद्य १२ पावेतों माहाराजांचे कृपेकरून सुखरूप असों. विशेष माहाराजांनी बाळा हुजऱ्या याजबरोबर मुक्तावलीसदृश स्वदस्तुर पत्र व सिमग्याचे सणाच्या गाठ्या तीन त्रिंबकजी डेंगळे यांजकडील कारकून घेऊन आला त्या पावल्या. पाहून बहुत हर्ष चित्तास जाहला. स्वारी गेलियापासून माहाराजांचे विलासजनित आनंदसुखाची स्मृति वारंवार मनास येऊन चित्त तदाकार होतें. कांही सुचत नाही. रात्रौ स्वप्नाचे ठायीं स्वारी बुधवारचे वाड्यांतिल बंगल्यांत चौपाळ्यावर माहाराजांचे संनिध आनंदांत निमग्न आहे, हा भास [२]निजध्यासें करून सुषुप्तीकाळीं प्रत्यहीं होतो. जागृत होऊन पाहावें, तों स्वामीचरणाची सांनिध्यता नाही! हें पाहून विरहेंकरून जी अवस्था होते, ती सर्वज्ञाप्रती मी लेहून किती कळवावी! स्वारीचें आगमन लौकर व्हावें, सेविसीं बाळा हुजऱ्या यास विनंती करावयास सांगितली होती. त्याने विनंती केली असेल. त्याजवरून पत्रीं आज्ञा की, स्वारी लौकरच येईल.

---

१ ही हरि रामचंद्र देवधर ऊर्फ ढमढेरे याची मुलगी. हिच्याखेरीज बाजीरावास इतर बायका–वगैरे होत्याच!

२ निदिध्यासें करून.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हीं अक्षरें पाहून बहुत आनंद झाला. [3]माहाराज तेथे आनंदांत—जनस्थानासारखें शहर क्षेत्र, त्यांत वसंतकाल, आमराई नूतन प्रफुल्लित बहरांत आली—त्या आनंदसुखांत असतील[3]!! माझी शरीरप्रकृत चांगली आहे. उपद्रव बाहेरील कांहीं येक नाहीं. येक स्वप्न पडलें होतें, तें सविस्तरपणें राजश्री मोर[4] दीक्षितनानांजवळ सांगितलें होतें. त्यांनी श्रुत केलेंच असेल. प्रियेस अहर्निशी माहाराजांचें सांनिध्य लौकर घडावें, हाच सर्वकाल वेध लागला आहे. स्वारीचें आगमन लौकर व्हावें, हेंच इच्छित आहे. सेवेसी श्रुत होय, हें विज्ञापना.

३ बाजीरावाच्या रंगेलपणास हा टोमणा आहे!

४ बाजीरावाचा उपाध्याय.

संपादकीय

लेखनाची ता. १० जानेवारी १९४७

पुनश्च हरि: ॐ!

'युगवाणी' च्या नोव्हें. डिसें. चा अखेरचा अंक वाचकांच्या हातीं देतांना मी त्यांचा निरोप घेतला होता. त्यावेळीं 'युगवाणी' चें संपादकत्व पुन: मजकडे येईल, अशी मला अपेक्षा नव्हती. एवढेंच नव्हे, तर खुद्द 'युगवाणी' मासिक तरी इत:पर कितपत चालू राहते, याचीच शाश्वति नव्हती! परंतु योगायोगाची गोष्ट अशी की, पुसद येथे गेल्या नाताळांत भरलेल्या वि. सा. संघाच्या दहाव्या अधिवेशनप्रसंगीं 'युगवाणी' चालू राहण्याबाबत कांहीं योजना मांडण्यांत आल्या. त्यांपैकी एक योजना सर्वानुमते मंजूर झाली; या योजनेप्रमाणे वि. सा. संघाचे तहाहयात सभासद उमरावतीचे रा. द. ना. टाकूर यांजकडे मासिकाची व्यावसायिक व्यवस्था सोपविण्यांत आली आणि मजकडे पुन: संपादकत्वाचें कार्य सुपूर्त करण्यांत आलें. वि. सा. संघाच्या कार्यकर्त्यांनी व सभासदांनी मजवर हा जो विश्वास प्रगट केला, त्याबद्दल मी त्यांचा अतिशय आभारी आहें. सर्वांच्या इच्छेप्रमाणे मी संपादकाचें काम स्वीकारीत आहें.

'युगवाणी' चे लेखक, ग्राहक व वाचक यांची सक्रिय सहानुभूति मला व माझे नवे सहकारी रा. द. ना. ठाकूर यांना यथापूर्व मिळत राहील, अशी पूर्ण उमेद आहे.

'युगवाणी' चें पुढील स्वरूप

गतवर्षी मुख्यत: छापखान्याच्या अडचणींमुळे 'युगवाणी' चे अंक निघण्यास पुष्कळदा विलंब होत गेला व कांहीं अंक तर 'जोड-अंक' म्हणूनच काढावे लागले! नवे व्यवस्थापक रा. ठाकूर यांचा स्वत:चा छापखाना असल्यामुळे इत:पर अंक त्या त्या महिन्यांत निघतील, असें समजण्यास हरकत नाही. जोड अंकाचेंहि यापुढे काम पडूं नये, असें वाटतें!

'युगवाणी' हें गतवर्षी केवळ वाङ्मयविषयास वाहिलेलें मासिक म्हणूनच निघत असे. परंतु अनेक वाचकांनी सूचना केल्यावरून 'युगवाणी' त वाङ्मयाव्यतिरिक्त इतर विषयांवरील मजकूरहि आता देण्यांत येणार आहे. अर्थात् तींत प्राधान्य वाङ्मय विषयासच राहील, हें सांगणें नकोच. मात्र इतर विषयांस मज्जाव राहणार नाही, एवढेंच, चालू अंकांतील मजकुरावर नजर टाकल्यास मासिकाच्या धोरणांतील हा फरक लगेच आढळून येईल.

गतवर्षी नवोदित लेखकांस स्थलाभावामुळे मासिकांत पुरेसें स्थान देतां आलें नाही. ही उणीव यापुढे शक्य तितकी काढून टाकण्यांत येईल. मात्र नवोदित लेखकांनी मासिकाच्या धोरणास अनुसरून व व्यासंगपूर्वक लेखन करावयास पाहिजे, एवढा प्रेमभावाचा इशारा मी त्यांस देऊं इच्छितों. 'बाल' किंवा 'कुमार'

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लेखकांसाठी स्वतंत्र सदर सुरू करण्याचा माझा विचार नाही, एवढें मौजेने नमूद करून ठेवतों !

मासिकांत पूर्वीचीं सर्व सदरें यथावकाश देण्यांत येतील.

मासिकांतील विषयांचें क्षेत्र वाढलें, यामुळे 'संपादकीय' हेंहि वाङ्मय विषयापुरतें मर्यादित राहणार नाही. 'संपादकीयां'त जरूरीप्रमाणें इतर विषयांचाहि परामर्ष घेण्यांत येईल.

तिघा प्राध्यापकांचें अभिनंदन

प्रा. वि. भि. कोलते यांचा 'महानुभाव तत्वज्ञान' या ग्रंथास नागपुर विद्यापीठाने 'कमला नारायण येंद्दरे पारितोषिक' देऊन गौरविलें आहे, याबद्दल प्रा. कोलते यांचें मी मनःपूर्वक अभिनंदन करतों.

'कै. सरस्वतीबाई-देशमुख-पारितोषिक' हें चालू वर्षी प्रथमच देण्यांत आलें. तें प्रा. वामनराव चोरघडे यांच्या 'प्रस्तान' व 'पाथेय' या दोन लघुकथासंग्रहांस मिळालें, याबद्दल त्यांचेंहि मी अभिनंदन करतों. पारवा येथील जहागीरदार रा. ब. द. कृ. देशमुख यांनी हें रु. ३०० चें पारितोषिक ठेवून उत्कृष्ट वाङ्मयास उत्तेजन देण्याचें थोर कार्य केलें आहे व त्याबाबत ते सर्वांच्या धन्यवादास पात्र आहेत.

पुसदच्या अधिवेशनाने 'वैदर्भी रीति' या विषयावर निबंध मागवून उत्कृष्ट निबंधास शंभर रुपयांचें बक्षीस जाहिर केलें होतें. उमरावतीचे प्रा. ग. त्र्यं. देशपांडे या तरुण संस्कृत-पंडितांस हें बक्षीस मिळालें, याबद्दल त्यांचेहि मी अभिनंदन करतों.

पुसदचें अधिवेशन

पुसद येथे २५, २६ व २७ डिसेंबर १९४६ रोजीं विदर्भ-साहित्य-संघाचें दहावें अधिवेशन विख्यात कादंबरीकार व 'भवितव्या'चे संपादक रा. पु. य. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखालीं अत्यंत यशस्वितेने पार पडलें. अधिवेशनाला वऱ्हाड-मध्यप्रांतांतील बहुतेक प्रमुख साहित्यिक व साहित्य-भक्त आले होते. कित्येक सुशिक्षित स्त्रिया व परप्रांतांतील प्रा. ना. सी. फडके-प्रभृति साहित्यिकहि उपस्थित होते.

अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष डॉ. मा. गो. देशमुख, उद्घाटक वीर वामनराव जोशी व अध्यक्ष रा. पु. य. देशपांडे यांचीं भाषणें एकंदरीने चांगलीं झालीं. डॉ. देशमुख यांचें भाषण अध्यक्षांच्या भाषणाएवढेंच जवळ जवळ होतें ! स्वागताध्यक्षाने एवढें मोठें भाषण न केलेलें बरें ! बाकी, डॉक्टरसाहेबांचें भाषण फार मार्मिक होतें व त्यांच्या वाचनाची तऱ्हाहि ठसकेबाज होती. अध्यक्षांचें भाषण अतिशय भरदार होतें.

अधिवेशनांत निरनिराळ्या विषयांवरील भाषणें, परिसंवाद, काव्यगायन, 'उसना नवरा' नाटक, गायन, नृत्य-वगैरे भरपूर कार्यक्रम ठेवण्यांत आला होता ! करमणुकीच्या दृष्टीने हा सर्व कार्यक्रम ठीक होता ! परंतु साहित्य-संमेलनांत नाटकासारख्या कार्यक्रमाची तादृश आवश्यकता नसते;—साहित्य-संमेलनांतील सर्व कार्यक्रम साहित्यविषयकच असावे, असें पुष्कळांचें प्रांजल मत आहे. तें मलाहि ग्राह्य वाटतें. खेरीज, अधिवेशन तीन दिवस लांबविण्यापेक्षा दोन दिवसांतच आटोपावयास पाहिजे.

पुसदकरांनी अधिवेशनाची व्यवस्था अत्यंत चोख ठेवली होती. त्याबद्दल त्यांची तारीफ करावी, तितकी थोडीच आहे !

पुढील अधिवेशन गोंदिया येथे भरणार आहे.

पुसदच्या अधिवेशनाने 'युगवाणी' जिवंत ठेवली, हें त्याचें एक वैशिष्ट्य म्हणून नमूद करतां येईल.

पुसदच्या अधिवेशनाचा अहवाल पुस्तकरूपाने प्रसिद्ध होणार आहे, असें समजतें. तें खरें असल्यास ही स्वागतार्ह घटना होय. या अहवालांत स्वागताध्यक्ष, अध्यक्ष-प्रभृतींचीं भाषणें समाविष्ट करण्यांत येतीलच. पुस्तकरूपाने अधिवेशनाचा अहवाल प्रसिद्ध करण्याची ही प्रथा पुढेहि चालू राहावी. किंबहुना, त्या त्या ठिकाणच्या स्वागत-मंडळावर ही एक आवश्यक अटच घालण्यांत यावी.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

(सरचिटणिसाकडून)

'पुसद'-चें 'विदर्भ साहित्य सम्मेलन'

विदर्भ-साहित्य-संघ-सम्मेलनाचें दहावें अधिवेशन पूर्वी जाहीर झाल्याप्रमाणे ता. २५, २६ व २७ डिसें. १९४६ या तारखांना पुसद (जि. यवतमाळ) येथे अत्यंत उत्साहाने व यशस्वी रीतीने पार पडलें. या सम्मेलनाचा हा विशेष होता की, महाविदर्भातील साहित्यिकांचा व साहित्यभक्तांचा अपूर्व मेळावा पुसद मुक्कामीं जमला होता.

हें विदर्भ साहित्य सम्मेलन महाविदर्भांतील नामवंत साहित्यिक, कादंबरीकार, कवि व सुप्रसिद्ध 'भवितव्य' साप्ताहिकाचे संपादक नागपूरचे श्री. पुरुषोत्तम यशवंत देशपांडे यांच्या संपादकत्वाखाली पार पडलें. सम्मेलनाचे स्वागताध्यक्ष या प्रांतांतील विद्वान् प्राध्यापक डॉ. माधव गोपाळ देशमुख हें होते. या संमेलनाचे उद्घाटन वऱ्हाडचे भीष्माचार्य वीर वामनराव जोशी यांच्या हस्तें झालें.

हस्तलिखितांच्या प्रदर्शनाचें उद्घाटन

सम्मेलनाच्या कार्यक्रमाला, ता. २५-१२-४६ रोजीं सकाळीं सुभाष नाटकगृहांत हस्तलिखितांच्या प्रदर्शनाच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाने सुरवात झाली. हें प्रदर्शनाचें उद्घाटन या प्रांतांतील सुप्रसिध्द संशोधक व प्राध्यापक श्री. वि. भि. कोलते यांच्या हस्तें झालें. त्याच प्रसंगीं सम्मेलनाला उपस्थित झालेल्या प्रतिनिधींचा परिचय समारंभहि अगदीच नावीन्यपूर्ण पद्धतीने घडवून आणण्यांत आला.

मुख्य कार्यक्रम

ता. २५-१२-४६ रोजीं सायंकाळीं सम्मेलनाच्या मुख्य कार्यक्रमाला सुरवात झाली. या प्रसंगीं स्वागताध्यक्ष, उद्घाटक, सम्मेलनाध्यक्ष यांचीं भाषणें झालीं. कोल्हापूरचे सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. ना. सी. फडके हेहि व्यासपीठावर या प्रसंगीं उपस्थित होते. वरील सर्व भाषणें सर्व वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालींच आहेत. व्याख्यात्यांच्या कीर्तीला साजेशींच सर्व व्याख्यानें झालीं.

व्याख्यानमाला व परिसंवाद

या सम्मेलनामध्ये दोन अगदीच वैशिष्ट्यपूर्ण असे कार्यक्रम झाले. पहिला म्हणजे व्याख्यानमालेचा आणि दुसरा म्हणजे परिसंवादाचा. पहिल्या कार्यक्रमांत प्रांतांतील, अनेक विद्वानांनी आपापल्या आवडीच्या विषयावर माहितीपूर्ण व विद्वत्तापूर्ण अशीं व्याख्यानें दिलीं. या कार्यक्रमांत प्रा. श्री. ना. बनहट्टी, श्री. मा. ज. कानेटकर प्रि. वि. प्र. मोहगावकर, प्रा. वामनराव चोरघडे, श्री. ब्रह्मे, प्रा. सरस्वती प्रसाद चतुर्वेदी, प्रा. कु. नातू इत्यादि अधिकारी वक्त्यांनी भाग घेतला होता.

वर उल्लेखिल्यापैकी दुसरा कार्यक्रम म्हणजे परिसंवादाचा. 'चित्र, शिल्प, नाट्य, नृत्य, संगीत व शब्द यांपैकी व्यक्तिमनावर परिणाम करण्याच्या दृष्टीने श्रेष्ठ कला कोणती?' या विषयावर त्या त्या विषयांतील तज्ञांनी या कार्यक्रमांत अत्यंत मनोरंजक व उद्बोधक अशी चर्चा केली. या कार्यक्रमांत अनुक्रमें प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, श्री. आ. रा. देशपांडे, प्रा. ना. कृ. दिवाणजी, श्री. रॉय, श्री. प्र. ना. खोडे व सौ. विमलाबाई देशपांडे यांनी भाग घेतला होता. हा कार्यक्रम प्रा. ना. सी. फडके यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या चर्चेचा प्रा. ना. सी. फडके यांनी केलेला समारोपहि उत्तम झाला.

सार्वजनिक वाचनालयाचा हीरक महोत्सव

ता. २६-१२-४७ ला सायंकाळीं सार्वजनिक वाचनालय, पुसद या संस्थेचा हीरक महोत्सव प्रा. ना. सी. फडके यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या थाटाने पार पडला. या प्रसंगीं प्रा. ना. सी. फडके यांनी सतत दोन तास अस्खलित भाषण करून श्रोतृवर्गावर जी मोहिनी पाडली तिचें अजूनहि स्मरण झाल्याशिवाय रहत नाही.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सम्मेलनाने मंजूर केलेले ठराव

या सम्मेलनाने ता. २७ रोजीं खुल्या अधिवेशनांत जे ठराव सर्वानुमतें मंजूर केले ते संख्येने नसले तरी महत्त्वाच्या दृष्टीने उल्लेखनीय आहेत. त्यांतल्यात्यांत नभोवाणी केन्द्र, नागपूर तसेंच सागर विद्यापीठ व मराठी, विदर्भांतील असंशोधित विभागाचें संशोधन, प्रांतिक सरकारांत 'साहित्य व कला' खातें इत्यादि विषयावरील ठराव विशेष उल्लेखनीय आहेत. हे सर्व ठराव, संघाच्या मध्यवर्ती कार्यालयातर्फे, प्रांतांतील सर्व वृत्तपत्रांत प्रसिद्धीसाठी रवाना करण्यांत आलेच होते.

करमणुकीचे कार्यक्रम

पुसदकरांनी आंखलेल्या कार्यक्रमांत करमणुकीचे झालले कार्यक्रमहि यशस्वी रीतीने पार पडले. ता. २५ चा काव्यगायनाचा कार्यक्रम 'नेहमीप्रमाणेच' झाला! मात्र ता. २६।१२।४६ चा श्री. एस्. वी. देशपांडे यांचा गायनाचा व ता. २७।१२।४६ चा श्री. रॉय यांच्या नृत्याचा व नागपूरच्या ॲकॅडेमी ऑफ ड्रॅमॅटिक आर्ट या संस्थेच्या 'उसना नवरा' या नाट्यप्रयोगाचा असे नंतरचे तीन कार्यक्रम मात्र उत्तम वठले.

पुसदकरांचा अकृत्रिम जिव्हाळा

पुसदकरांनी प्रतिनिधींची जी व्यवस्था ठेवली होती, ती तर अत्यंत समाधानकारक होती. या व्यवस्थेबरोबर पुसदच्या कार्यकर्त्यांचा अकृत्रिम जिव्हाळाहि होता. मग प्रतिनिधी पुसदकरांवर बेहद्द खूष होतील यांत नवल काय! पुसदकरांची एकजूट तर विशेष उल्लेखनीय दिसून आली. पुसदचें हें दहावें अधिवेशन अपूर्व उत्साहाने पार पाडल्याबद्दल स्वागतसमितीचे जेवढे आभार मानावेत तेवढे थोडेच होतील. विशेषतः डॉ. मा. गो. देशमुख, श्री. शंकरराव सरनाईक, श्री. गोधाजीराव मुखरे, डॉ. सरनाईक, श्री. पांडे, श्री. बळिरामपंत एकबोटे, श्री. शुक्ल आणि त्यांचे सर्व सहकारी कार्यकर्ते यांचे विशेष गौरवाने आभार मानले पाहिजेत. विदर्भ साहित्य संघाच्या कार्याला व प्रगतीला पुसद सम्मेलनामुळे अपूर्व अशी चालना मिळाली आहे असें म्हणणें भाग आहे.

कार्यकारी मंडळाच्या व साधारण सभासदांच्या सभा

पुसद सम्मेलन प्रसंगीं ता. २५ व २६ ला दुपारच्या वेळीं विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाच्या सभेचें आणि साधारण सभेचें कामकाज झालें. या कामकाजांत एक जर कोणती महत्त्वाची गोष्ट घडली असेल, तर ती ही की संघाच्या 'युगवाणी' मासिकाची कायम स्वरूपाची योजना आखण्यांत आली. संघाचे आजीव सभासद श्री. द. ना. ठाकूर, मुधोळकर पेठ, अमरावती यांजकडे इतःपर युगवाणीची आर्थिक व प्रकाशन विषयक जबाबदारी सोंपविण्यांत आलेली आहे. कार्यकारी मंडळाने व साधारण सभेने मुद्दाम तदनुसार ठराव करून वरील योजनेस मान्यता दिली. संघाचे सर्व सभासद पूर्ववत् श्री. ठाकूर यांजशी सहकार्य करतील व 'युगवाणी'चें वैभव सर्व दृष्टींनी वाढविण्यास मदत करतील अशी दृढ आशा आहे.

मात्र 'मातृभूमी'च्या वातमीदाराने या बाबतींत जो विपर्यस्त मजकूर 'मातृभूमी'त प्रसिद्ध केला आहे, त्याप्रमाणे हें 'युगवाणी'चें 'दत्तविधान' नसून, श्री. वामन नारायण देशपांडे यांच्याच संपादकत्वाखाली संघाचें मुखपत्र म्हणूनच 'युगवाणी' यापुढेहि प्रसिद्ध होत जाईल असा खुलासा करणें भाग आहे.

वर उल्लेख केलेल्या साधारण सभेत याशिवाय कांही बाबतींत घटनेंत दुरुस्तीहि करण्यांत आली या व मागील सर्व दुरुस्तीसह संघाची घटना पुन सभासदांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यांत येईल.

कार्यकारी मंडळाच्या सभेंत सरचिटणीसांनी सभेपुढे ठेवलेला १९४६ चा अहवाल मंजूर करण्यांत आला.

दोन पारितोषकें

या सम्मेलनाच्या वेळीं आपल्या प्रांतांतील दोन विद्वान् व व्यासंगी लेखक वर्धेचे प्रा. वा. कृ. चोरघडे व अमरावतीचे प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांना अनुक्रमें ३०० रुपयांचें सरस्वतीबाई देशमुख 'पारितोषक' व 'वैदर्भी रीति' या निबंधाबद्दल स्वागत मंडळाने ठेवलेलें १०० रु. चें पारितोषक अध्यक्षांच्या हस्तें देण्यांत आलें.

अभिनन्दन!

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणीच्या व्यवस्थापकीय बदलामुळे जाने. चा अंक उशीरा हातीं घ्यावा लागत आहे. कागद नियंत्रणामुळे अंक नेमकेच काढल्यामुळे वर्गणीदारांनी त्वरा करावी, अन्यतर त्यांस निराश व्हावें लागेल याबद्दल क्षमस्व. या पुढील अंक नियमित दर महिन्याचे १५ तारखेस निघेल.

—व्यवस्थापक

"मराठा मंदिर"

बहुजन समाजाच्या उन्नतीकरतां मुंबईंत "मराठा मंदिर" ही संस्था स्थापन झाली असून अवघ्या पावणेदोन वर्षांत निरनिराळ्या प्रांतांतील सुमारे दोन हजार सभासद येथेच्या पटावर आहेत. मंदिराने नुकतीच साडेपांच लाख रुपयास मुंबईंत अिमारती करितां जागा घेतली आहे. आयुष्यांत फक्त अेकदांच कमीतकमी १० रु. भरून संस्थेचे सभासद होऊन समाजकार्यास समाज बांधवानी हातभार लावावा.

'मराठा मंदिर क्लब'

बहुजन समाजांतील बांधवांच्या विचारविनिमयाचें महत्त्व जाणून बाहेरगावाहून मुंबअींस येणाऱ्या पाहुण्यांची राहाण्याची व जेवणखाण्याची सोय व्हावी आणि आपल्या चळवळीबद्दल त्यांच्याशीं उहापोह करतां यावा म्हणून क्रिकेट क्लब ऑफ अिंडियाच्या धर्तीवर 'मराठा मंदिर क्लबची' स्थापना करण्यांत आली आहे व त्याचे सभासदत्व मराठा व तत्सम जातीकरितां खुलें आहे.

'मराठाश्रम'

परगांवच्या मध्यम वर्गीय समाजबांधवांची राहाण्याची व जेवण्याची सोय करण्या करितां माधवाश्रमाचे धर्तीवर 'मराठाश्रमाची' व्यवस्था असून अेकेवेळीं पंचवीस समाज बांधवांस राहतां येअील अशी व्यवस्था स्वतंत्र खोल्या बांधून करण्यांत येणार आहे.

पत्रव्यवहाराचा पत्ता: "मराठा मंदिर"

३२० ठाकुरद्वार, मुंबअी नंबर २

पाडव्याचे सुमुहूर्तावर मराठा मंदिर प्रकाशन अंक नं. २ बाहेर पडेल. सभासद फॉर्म व प्रकाशन अंक अकोला येथे वतनदार प्रेस व नित्यानंद मोहिते महाराज यांचेकडे व खामगांव येथे रा. नानासाहेब बोबडे वकील यांचेकडे मिळतील.

द. ना. ठाकूर यांनी ठाकूर आणि कंपनी लि. च्या महेश्वर मुद्रणालयांत छापून 'युगवाणी' कार्यालय १९,४२५ मुधोळकर पेठ येथे प्रकाशित केलें.

किरकोळ अंकास ८ आणे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ